# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १३.०४.२००६ रोजी संपन्नझालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक १३/०४/२००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.३० वाजता ''वंदेमातरम्'' या गिताने सुरू झाली . सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२४. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२५. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२६. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३२. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग

३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३४. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३५. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३६. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३७. स.स.श्री.खान निसार मो.खान
३८. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४१. स.स.सौ.राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४३. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४५. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४७. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४८. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४९. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
५०. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
५१. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५२. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५३. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५४. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५५. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५६. स.स.सौ.रेखा कैलासराव काथार
५७. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५८. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५९. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६०. स.स.श्री.खुडे विजय किसन
६१. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६२. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६५. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६६. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७०. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७२. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७४. स.स.श्री.जोशी संजय रामदास

७५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७६. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७७. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७८. स.स.श्री.बारवाल गजानन
७९. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८०. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरेंद्रसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात जो सावळा गोंधळ चालू आहे त्यावर आजच चर्चा होवू दयावी अशी विनंती आहे. इयत्ता ५ वी व ६ वी वर्गाच्या विषय पत्रिकेमधे प्रश्न क्र.५ Make Sentences from Table हा प्रश्न ६ मध्ये असावयास पाहिजे होता.कारण हे सर्व ६ नंबरचे प्रश्न आहेत. ही प्रश्न पत्रिका चूकीची छापल्या गेलेली आहे. त्यामूळे परीक्षेला विदयार्थी गोंधळात पडले. तसेच दुसरे असे की मराठी माध्यमच्या विदयार्थ्यांना प्रश्नपत्रिका दिली व त्यात असे म्हटले की उर्दूतून भाषांतर करावे . प्रश्न पत्रिकेत याच शब्दाला दूसरा कोणता शब्द आहे असा आशय आहे. त्याचे उत्तर त्यामधेच दिलेले आहे.त्यामूळे ही प्रश्नपत्रिकाच चूकीची तयार केलेली आहे ती कोणी तयार केलेली आहे यास जबाबदार कोण.खुलासा घेण्यात यावा.

श्री.भागवत कराड : प्रश्नपत्रिकेत चूका असतील तर माफ करू नये.

श्री.महेश माळवतकर :विदयार्थ्यांना परीक्षा केद्रांवर जी प्रश्नपत्रिका दिली ती चूकीची दिली. हे सर्व सजल्यानंतर जी धावपळ केलेली आहे. जर प्रश्न पत्रिका चूकीची देत असेल व त्यामूळे विदयार्थ्याचे होणारे नूकसान होते तर यास जबाबदार कोण असणार आहे. प्रश्नपत्रिका कोठे काढली कूठे छपाई झाली. चूक झालेली असेल तर जे जे याशी संबधीत असेल त्याचा खूलासा होणे आवशक आहे चौकशी केली पाहिजे.

श्री.संजय जोशी :मराठी माध्यमच्या विदयार्थ्यांना जी प्रश्नपत्रिका दिली त्यात असे दिले की उर्दूतून भाषांतर करावे. अतिशय निंदणीय बाब आहे प्रश्नपत्रिका कोणी काढली त्याची चौकशी व्हावी.

मा.महापौर :उपआयुक्त प्रशासन यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (प्र) :आताच जो शाळेच्या प्रश्नपत्रिके संदर्भात मुद्दा उपस्थित केला त्याची माहिती घेण्यासाठी एक तासाचा वेळ देण्यात यावा.

श्री.संजय जोशी : सदर प्रश्नपत्रिका चूकीची आहे याबाबत एका शिक्षकाने देखिल प्रशासनाकडे तक्रार केली. उपआयुक्त प्रशासनाकडे माहिती आलेली नाही याचा अर्थ शाळेचे शिक्षक सुध्दा जबाबदार आहे.अतिशय निंदणीय बाब आहे वेळ देण्याची गरज नाही.

श्री.महेश माळवतकर :मूळात ही प्रश्नपत्रिका कूणी काढली .त्याची छपाई कूठे झालेली आहे. याची माहिती घ्यावी. सकाळी ८.०० वाजता परिक्षा सूरू झाली. एकूण ७५ शाळावर

परीक्षा चालू आहे. याबाबतील प्रशासनाकडे आतापर्यंत माहिती येत नसेल तर यास जबाबदार कोण आहे.

श्री.संजय केनेकर : जे शिक्षक जबाबदार असतील त्यांचेवर निलंबणाची कार्यवाही करावी.

श्री.कोकाटे काशीनाथ :जी प्रश्नपत्रिका होती ती सकाळी शाळेत परीक्षेसाठी वाटप झालेली आहे. सकाळी ८.०० वाजेपासून आता दुपारचे १.०० वाजले असून या मधल्या वेळात प्रशासनाकडे या बाबतीत चूक झालेली आहे म्हणून माहिती येणे आवशक होते. परंतू माहिती दिली नाही. प्रशासनाला याचा कोठेही गंध नाही याचा अर्थ प्रशासन पूर्णत: अकार्यक्षम आहे. हा आरोप नसून वस्तूस्थिती आहे. जे या विभागाचे विभाग प्रमूख आहे त्यांनी माहिती उपलब्ध करून दयावी नसता कार्यवाही प्रस्तुत करावी.

श्री.संजय जोशी :प्रश्नपत्रिका कूठे व कोणी छपाई केली व कोणी काढलेली आहे याची माहिती प्रशासनाकडे असेल.

सौ.रजनी जोशी : शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार उपआयुक्त यांचेकडे आहे. जास्तीच्या कामाचा व्याप वाढल्यामूळे असा प्रकार झालेला दिसतो. शिक्षणाधिकारी यांचे त्याकडे लक्ष नाही. त्यासाठी शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज इतर दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्यात यावा. जे अगोदर काम पाहत होते या पदावर काम केलेले आहे त्यांचेकडेच हा पदभार सोपवावा.

श्री. प्रशांत देसरडा : हा विषय गाभीर्याने घ्यावा विदयार्थ्याच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

श्री.कैलास गायकवाड :छपाई करतांना चूक झाली कि अधिकाऱ्याकडूनच चूक झाली याची माहिती घेवूनच योग्य तो निर्णय घ्यावा.

डॉ. भागवत कराड :ज्यानी प्रश्न पत्रिका काढली असेल व ती प्रशासनास चूक वाटत असेल तर संबधीतावर निलंबाणाची कार्यवाही करावी.

श्री. संजय जोशी : मा. आयुक्ताकडे प्रश्नपत्रिका दिलेली आहे त्यात चूक झाली की नाही याचा खूलासा करावा. सभागृहाला माहिती कळेल.

मा.आयुक्त : जी प्रश्नपत्रिका माझ्याकडे स. सदस्यांनी दिली आहे त्यात दोन ठिकाणी छपाई दोष आहे. यात इंग्रजी सुध्दा बरोबर नाही. यात बेसीक इंग्रजीमधे सूध्दा चूक आहे. ग्रामर मधे हे बसत नाही चार पाच शिक्षकाची एक कमेटी असते ती कमेटी प्रश्न पत्रिका तयार करते प्रूफ रिडींग करण्याची जबाबदारी त्यांचेवर असते. थोडा वेळ दयावा कमेटीतील जे आहे त्यांना बोलवले जाईल. जी चूक आहे ती १०० टक्के आहेच तसेच जे प्रूफ रिडींग करतात जे जिम्मेदार असतील त्यांचेवर ॲक्शन घेतली जाईल.ज्यांनी प्रश्नपत्रिका काढली त्याशिक्षकांची हेरींग घेणे आवश्यक आहे

श्री. प्रशांत देसरडा : कमेटी करण्याची आवश्यकता नाही. अनेक प्रकरणात चौकशी समिती गठीत केलेली आहे असून त्यांची चौकशी चालू आहे.

मा.महापौर : चौकशी समिती नेमणार नाही . प्रशासनाने वेळ मागवून घेतलेला आहे.सभागहात अर्धा तासात अहवाल येईल लगेच निर्णय घेतला जाईल.

श्री.संजय जोशी :या संबधी ताबडतोब कार्यवाही करण्याचे आदेशीत केल्याबध्दल मा. महापौरांचे अभिनंदन करतो.

श्री.मुजीब खान विदयार्थ्यांचा भवितव्याचा प्रश्न आहे. चौकशी करावी. तसेच महापालिकेच्या शाळेत एकूण किती विदयार्थी संख्या आहे. काही शाळेत विदयार्थी संख्या नसतांना संख्या दाखविलेली आहे.शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

मा.महापौर : जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात रूलींग दिले आहे. शाळेचा दर्जा सूधारणासाठी विचार केला जाईल. विदयार्थ्याची संख्या किती याची माहिती घेता येईल.

डॉ. भागवत कराड : दैनिक सकाळ मध्ये बातमी आली की एका ठेकेदारास १३ विविध कामे दिलेली आहे. एकाच ठेकेदारास १३ कामे का देण्यात आलेली आहे कोणते ठेकेदार आहे नाव सांगावे. इलेक्ट्रीक ठेकेदारास स्थापत्य कामे दिलेली आहेत. ६७(३) प्रमाणे मा. आयुक्तांना अधिकार असेल तर तसा खूलासा होण्याची आवशकता आहे.

श्री.कैलास गायकवाड : मुख्य जलवाहिनीवरून अनेक गुठेंवारीच्या भागात अनधिकृत नळ घेतलेले आहे. ते लोक पाणी पट्टी भरीत नाही. जे लोक नळ पट्टी भरतात त्यांचे नळ कट केले जाते. जे पाणी घेवूनही पाणी पट्टी भरीत नसतील त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहात.

श्री. संजय केनेकर :१३ कामे कोणत्या एकाच एजन्सीला दिलेली आहे. हे सातत्यानेहोत आहे. इतर ठेकेदार काम करण्यास सक्षम नव्हते का?ज्या एजन्सीला १३ कामे दिली ती एजन्सी सर्वे करते व जेथे लाईट बंद आहे असे दाखवते व लाईट लावले जात नाही.

श्री.अ. रशीद खान : मृत देह जाळण्यासाठी विदयुत दाहीनी घेण्यात आली. दोन मृतदेह जाळले. त्यानंतर आजपर्यंत बंद होते. दीड लक्ष खर्च केले. कंपनी दिल्लीला आहे. तेथे कॉन्टॅक्ट होतो. एजन्ट मार्फत काम केले जाते. कंपनीवर जबाबदारी सोपवावी.

श्री. प्रशांत देसरडा :तातडीची कामे म्हणून त्या कामाना मंजूरी दिली जाते. परंतू त्यात बारकाईने बघीतले असे दिसून येईल की मंजूर करण्याची तारीख व वर्क ऑर्डर दिल्याची तारीख यात चार महिण्याचा फरक दिसून येईल. तर तातडीची कामे म्हणता येईल का?

डॉ.भागवत कराड :दैनिक सकाळमध्ये जे आलेले आहे त्या एजनसीला तातडीचे काम म्हणून देण्यात आले काम दिल्यानंतर चार महिण्यानंतर काम झाले. १३ कामे दिलेली असून एकाच एजन्सीला त्याची स्पेशीलिटी नसतांना सूध्दा ती कामे का दिलेली आहे याची चौकशी व्हावी.

श्री.केनेकर संजय :या एजन्सीने शहरात लाईट बंद दाखवलेले आहे व तेथे नवीन लाईट बसवायचे म्हणून महापालिकेकडून बील घेतलेले आहे.

मा.महापौर : दैनिक सकाळ मध्ये जी बातमी आलेली आहे एकाच एजन्सीला १३ कामे दिलेली आहे व स.सदस्य श्री.देसरडा यांनी म्हटल्याप्रमाणे ६७ (३)(क) नुसार कामे देवूनही वर्क ऑर्डर देण्यास चार महिने लागलेले आहे. या बाबतीत मा.आयुक्त यांनी सविस्तर चौकशी करून पूढील बैठकीत अहवाल ठेवावा.

श्री. संजय जगताप :मागिल बैठक ही बजेटची होती म्हणून आपल्या विनंतीस मान दिला व इतर विषयावर चर्चा केलेली नाही परंतू जकात विभागात जकात अधिक्षक तसेच उपआयुक्त महसूल यांनी एका व्यापाऱ्याची लूट केली असावी असा माझा अंदाज आहे. १ टक्का २ टक्के यामध्ये फरक दिसून येतो. खाद्यतेल तसेच बेकरीचा माल आहे. काही दिवसापूर्वी या मालावर एक टक्का प्रमाणे जकात वसूल केलेली असून त्यानंतर दोन टक्केनी पावती दिलेली आहे. खाजगीकरणाचा व याचा काहीही संबध येत नसतांना श्री वाहूळ यांनी यामध्ये काही तरी घोळ केलेला असावा या बाबतीत एक चौकशी समिती नियुक्त करावी. याचा निर्णय घेण्यात यावा सर्व पूरावे सादर करीत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : या बाबतीत चौकशी व्हावी. अधिकाऱ्याना पाठीशी घालू नये.

मा. महापौर :या संदर्भात वृत्तपत्रातही छापून आलेले आहे एक टक्का घ्यायचे की दोन टक्के . खाजगीकरण होण्या अगोदर बेकरी अॅटमवर एक टक्के प्रमाणे जकात आकारणी होत होती. खाजगीकरण झाल्यानंतर दोन टक्के प्रमाणे जकात वसूल होत आहे.

मा.आयुक्त यांचेकडेही हे प्रकरण आलेले असून माझ्या माहिती प्रमाणे या बाबतीत निर्णय दिलेला नाही. खाजगीकरण होण्या अगोदर एक टक्का प्रमाणे वसूल होत होते खाजगीकरण झाल्यानंतर श्री. अग्रवाल हे दोन टक्के प्रमाणे वसूल करीत आहे. कोणते योग्य आहे मा. आयुक्तांनी खूलासा करावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :सदर एजन्सीने आजपर्यत महापालिकेस एक टक्का प्रमाणे जकात दिली असेल तर आतापर्यत महानगरपालिकेचे किती उत्पन्न बुडीत झालेले आहे याची सूध्दा चौकशी व्हावी. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी जर कूणी प्रयत्न करीत असेल तर त्याचा अभिनंदनाचा ठराव घ्यावा. स. सदस्य हे महानगरपालिकेचे ट्रस्टी आहेत. जेंव्हा पासून सदर एजन्सीकडून कमी वसूल केलेली असेल ती वसूल करावी.या बाबत तपासणी करावी.

श्री. कैलास गायकवाड :आतापर्यत जे जकात अधिक्षक होवून गेले त्या त्या जकात अधिक्षक यांनी एक टक्का की दोन टक्का प्रमाणे वसूल केले यांची चौकशी व्हावी.

मा. महापौर :प्रशासनाकडून अगोदर खूलासा घेवू त्यानंतरच निर्णय घेता येईल.

श्री.संजय जगताप :अधिकाऱ्यांनी चूकून एक टक्का वसूल केली असेल तर महापालिकेचे उत्पन्न डुबले आहे त्यांचे पगारातून कपात करावे.

मा.आयुक्त :एक ॲटम आहे त्यास बेकरी शॉटनिंग म्हणतात यावर किती जकात आकारायची हा विषय माझ्या समोर आलेला होता.यावर पूर्वी एक टक्का जकात घेतली जात होती . खाजगी अभिकर्त्या मार्फत दोन टक्का प्रमाणे आकारणी केली होती तो विषय माझ्या समोर हेरींगसाठी आला होता. बेकरी शॉटनिंग किती जकात आकारावी ते शेडयूल मधे नाही. जो आयात करीत होते, त्यांचे असे म्हणणे होते की हे पाच अ मधे येते. परंतू ते ५ अ मधे १०० टक्के येत नाही. कारण ते इडेबल ऑईल नाही. त्यांनी नंतर सांगितले हे ५ अ मधे किंवा ब मध्ये बसेल. कारण ते बटर आहे. त्यांनी इंग्रजी शब्दकोष दाखवला, त्याप्रमाणे शॉटनींग असा फॅट आहे जो असा अर्थ निघतो. पेस्टीसाठी वापरण्यात येते. बटर फॅट असते. परंतु प्रत्येक बटर फॅट असेल अशी वस्तुस्थिती नाही. माझ्या समजप्रमाणे ५ ब मध्ये बसत नाही. आपल्या कर्मचाऱ्याचे म्हणणे होते की हे ११ सी मधे बसणार जे फिनींशड गुडस् आहे. परंतू ११ सीमधेही ते टेक्नीकली बसत नाही. शेवटचे जे शेडयूल आहे त्यात असे दिले की जे कोणत्याही मधे बसत नाही त्यावर ४ टक्के जकात ध्यावी.ही वस्तुस्थिती आहे. स्पीरीटचा विचार न करता शब्दाचा विचार करता जर दयावे लागले तर उत्तर मला चार टक्केचे दयावे लागेल.

मा.महापौर : आपणांस १ टक्का की २ टक्का जकात वसूल करण्याचे अधिकार आहे.

श्री. संजय सिरसाट :इतर खूलासा न करता नियमाप्रमाणे किती टक्के जकात आकारणी व्हावयास पाहिजे होती. जर ठेकेदार दोन टक्के वसूल करीत असेल तर महापालिकेने एक टक्का कोणत्या नियमाने वसूल केलेले आहे.

मा.आयुक्त :या प्रकरणासाठी निर्णय घेण्यासाठी मी चार पाच दिवस घेतेले आहे. माझ्या मनात त्या संबधी काही तरी विचार चालू असेल. कधी कधी निर्णय लगेच देता येत नाही. एक टक्का मधे १०० टक्के बसत नाही. जकातीमधे आपले ठरलेले प्रिन्सीपल आहे. कंपनीचे कोणतेही इंडस्ट्रीजचे रॉ मटेरीयल असेल तर २.७५ रू टक्के प्रमाणे घेणार जर फिनींश गूड असेल लक्झरी ॲटम असेल तर ४ टक्के घेणार असे प्रिन्सीपल ठरलेले आहे. जर प्रिन्सीपल प्रमाणे गेलो तर हे दोन टक्के मधे बसावयास पाहिजे. जर शब्दा प्रमाणे गेलो तर दोन टक्के मधे बसत नाही. डायरेक्ट ४टक्के मधे जाणार मला असे वाटते अशा प्रकरणात प्रिन्सीपल प्रमाणे

जावून यावर दोन टक्के जकात आकारणी व्हायला पाहिजे. आतापर्यत एक टक्का जकात वसूल होत होती. त्यामधे मी असे ही म्हणेल की आपल्या कर्मचाऱ्याची इनप्रींसीपल चूक असेल, परंतू जाणून बूजून ही चूक कर्मचारी यांनी केली हे सांगता येणार नाही.हा कन्फ्यूजींग विषय होता. इन प्रिन्सीपल प्रमाणे गेलो तर दोन टक्के जकात घ्यायला पाहिजे आणि शब्द प्रमाणे गेलो तर चार टक्के मधे जाणार. मला असे वाटते आपण सर्वांनी निर्णय घ्यावयास पाहीजे. अशा प्रकरणात आपण दर निश्चित करून घ्यावयास पाहीजे. दर जे आहे ते सभागृह निश्चित करते. शेडयूल मान्य केले आहे ते सर्वसाधारण सभेने मान्य केलेले असून नंतर शासनाने मान्य केले आहे अशा प्रकरणात प्रिन्सीपलने जायला पाहिजे व दोन टक्के जकात आकारणी करायला पाहिजे. आतापर्यत एक टक्का घेतले त्यात महापालिकेच्या कर्मचाऱ्याची जाणूनबूजून चूक नाही असे वाटते. जर दोन टक्के प्रमाणे वसूल करण्याचा निर्णय घेत असेल तर मागिल एक वर्षाचे किंवा दोन वर्षाचे जे एक टक्के प्रमाणे घेतले आहे. त्या आयात करणाऱ्या व्यक्तीकडून डिफरन्स वसूल करावयास पाहिजे आणि ते करणे योग्य राहिल. योग्य होईल.

श्री. संजय सिरसाट : सभागृहात स.सदस्य झालेली चूक निदर्शनास आणून दिल्यानंतर प्रशासन डायरेक्ट व्यापाऱ्याकडून वसूल करू असे सांगतात. प्रशासनाचे अधिकारी काय चूक करतात याकडे लक्ष दिले जात नाही. जकात खाजगीकरणापूर्वी आपण १% वसूल करीत होतो. खाजगीकरण झाल्यानंतर जर दोन टक्के जकात घ्यावयास पाहिजे. असे ठेकेदार नियम प्रशासनास शिकवित असेल तर एक टक्का वसूल केलेले चूकीचे आहे. व्यापाऱ्याला आपण काय रीलीफ देणार.

मा.आयुक्त : ठेकेदार प्रशासनास नियम शिकवित नाही. त्यांचे मताप्रमाणे २% होतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एजन्सीसाठी आपण का भांडावे.

मा.महापौर :चर्चेला वेगळे वळण देवू नये संबधीत एजन्सी जर चूकीने एक टक्का ऐवजी दोन टक्के घेत असेल तर रद्य करण्याचा अधिकार या सभागृहास आहे. किती टक्के घ्यायचे हे सभागृह ठरविल, चूक कोणाची आहे हा प्रश्न आहे. किती टक्के घ्यायचे हे सभागृह ठरविल.

डॉ. भागवत कराड : प्रशासनाचे अधिकारी म्हणून मा.आयुक्त मूख्य आहे त्यांनी सांगितलेला निर्णय मान्य करावा. जे महापालिकेच्या फायदयाचे असेल तेच मा.आयुक्त करतील त्यांचेकडे जबाबदारी दयावी. सभागृहाने त्यांनी योग्य ती कार्यवाही करावी, म्हणून निर्णय घ्यावा.

श्री. संजय सिरसाट :दोन टक्के प्रमाणे आता वसूल होत आहे ते बरोबर आहे असे म्हणावे लागेल किंवा आता दोन टक्के प्रमाणे ठेकेदार वसूल करीत आहे हे दुसऱ्या बाजूने बरोबर आहे असे म्हणावे लागेल. फक्त निर्णयासाठी हा विषय पेडींग पडलेला आहे. ताबडतोब निर्णय घ्यावा. जी दोन टक्के ठेकेदार जकात आकारणी करीत आहे ती बरोबर आहे असे आयुक्तांनी म्हटले पाहिजे. किंवा यापूर्वी १ टक्का प्रमाणे वसूली केली ती बरोबर आहे, जर १% चुकीने वसूल केली असेल तर संबधीतावर कार्यवाही झाली पाहिजे. निर्णय ताबडतोब सभागृहात व्हावा.

मा.आयुक्त : स.सदस्यांनी प्रश्न विचारला त्याबद्दल मी माझी भूमीका स्पष्ट करतो. ठेकेदार प्रशासनास काही नवीन शिकवीत नाही. त्यांचे म्हणने आहे, खाजगीकरणामूळे कोणतेही रूल बदलले नाही शेडयूल बदलले नाही. त्यांची समज होती, दोन टक्का प्रमाणे यावे. लावायला पाहीजे. पूर्वी आपण १% लावत होतो. म्हणून हा वाद माझ्या समोर आला. सभागृह ज्या प्रमाणे मान्यता देईल त्याप्रमाणे जकात घेणे

ठेकेदारास बंधनकारक राहिल. मला असे वाटते जेंव्हा प्रिन्सीपल व शब्द मधे अंतर असेल तर प्रिन्सीपल प्रमाणे जायला पाहिजे व या प्रकरणात दोन टक्के प्रमाणे वसूल करावयास पाहिजे. पहिला मुद्या असा की एक टक्का घ्यावे की दोन टक्का की चार टक्के दुसरे असे की जर चूक होत असेल तर आपल्या लोकांच्या विरूध्द ॲक्शन घ्यायला पाहिजे की नाही. तिसरे असे की त्यांचेकडून वसूल करावयास पाहिजे की नाही. २ रा व ३ ऱ्या मुद्याचे उत्तर प्रथम देण्यांत येते. आम्हाला पण कन्फ्यूज होत आहे की शब्दाप्रमाणे चार टक्के घ्यायला पाहिजे प्रिन्सीपल प्रमाणे दोन टक्के घ्यायला पाहिजे यापूर्वी एक टक्का प्रमाणे कर्मचाऱ्यानी जकात घेतली असेल तर जाणूनबूजून आकारलेली आहे असा त्याचा अर्थ होत नाही. चूक होवू शकते आणि चूकला पनीश करू नका. आपणांसही शंका आहे, १% असावे,की २% असावे. माझ्या अधिकाऱ्यांनी १% घेतला असेल चूक आणि गुन्ह्यामध्ये इन्टेन्शनचा फरक असतो. मला पण २-३ दिवस निर्णय घ्यायला लागेल. कर्मचाऱ्याची चूक होवू शकते परंतू गुन्हा नाही . एक टक्का प्रमाणे वसूल केलेले आहे.जाणून बूजून घेतले असेल त्यामागे काहीतरी कारण होते असे नाही. अधिकाऱ्याची चूक होवू शकते परंतू गुन्हा आहे असे मी मानत नाही. आता दोन टक्का प्रमाणे वसूली होत आहे. ती मान्य करायची असेल तर जो फरक आहे तो वसूल करावयाचा की नाही सभागृहाने निर्णय घ्यावा. मा.सभागृहाने वसूल करावे म्हणून आदेश दिले तर वसूल करतो.

श्री. संजय सिरसाट :आयुक्तांनी जे स्टेटमेंन्ट केलेले आहे ते अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. नजरचुकीने चूक झाली असेल तर तो गुन्हा होत नाही असे म्हणणे चूकीचे आहे. एक टक्का प्रमाणे वसूल केली ही चूकच झालेली आहे.

मा.आयुक्त :कायदयामध्ये पण गुन्हाची परीभाषा आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी जाणूनबूजून केलेले नाही असे मला वाटते.

श्री.संजय सिरसाट :कायदयाच्या परीभाषा फार वेगवेगळया आहेत. झालेली ही चूक च आहे.

श्री. कैलास गायकवाड :यापूर्वी जे जकात अधिक्षक होते त्यांनी एक टक्का प्रमाणे वसूल केले की दोन टक्के प्रमाणे याची पण चौकशी व्हावी.

श्री. मुजीब खान :जकात विषयी मी एक वर्षापासून जकातीच्या संदर्भात माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असून जकात पावती बूक संदर्भातही अदयाप चौकशी पूर्ण झालेली नाही. गरवारे केमिकलवर रूपये २.७५ प्रमाणे जकात आकारणी करावयास पाहिजे होती परंतू एक रूपया प्रमाणे जकात वसूल होत होती .संबधीत ठेकेदार हे २.७५ रूपये प्रमाणे जकात वसूल करीत आहे. यापूर्वी केमिकलवर १रूपये प्रमाणे कसे वसूल केले. जकात नाक्यावर चौकशी केली असता ठेकेदार २.७५ रू.प्रमाणे वसूल करीत आहे. याचा खूलासा व याची चौकशी झाली पाहिजे. आताच आयुक्तांनी म्हटले कर्मचाऱ्याची चूक झाली असेल ज्यात लाखो रूपयाचा भ्रष्टाचार होतो.त्यास चूक झाली असे म्हणता येणार नाही. संगणमत करून हे केले जाते संबधीत कंपनीचे इजिनिअर अधिकाऱ्यांना येवून भेटतात त्यामूळे असे प्रकार होतात. मा. आयुक्तांना माहित नसते. या बाबतीत सर्व चर्चा हॉटेलमधे बसून होते. जकात पावती बुक क्र सहित प्रशासनाकडे चौकशी करण्यासाठी दिलेले आहे परंतू अदयाप चौकशी केलेली नाही. पुस्तकांचे लेखा परिक्षण बरोबर झाले नाही. पुन्हा चौकशीसाठी दिले. मा.महापौर यांचेकडे सूध्दा सर्व कागदपत्र दिलेले आहे. एक वर्ष जर चौकशी करण्यास लागत असेल तर योग्य नाही. ही चौकशी पूर्ण व्हावी, लेखा अधिकाऱ्यांचा यात खूलासा व्हावा.

मा.आयुक्त :मार्च महिण्यामध्ये पूर्ण वर्षाचे दुकान मधे जावून ऑडीट करतो की किती माल आणलेला होता व जकात किती भरलेली आहे. येणारा फरक वसूल करतो. मागिल वर्षी मार्च मधे जे झाले होते त्याबध्दल स. सदस्यांनी तक्रार दिली होती. त्याबाबत सुनावणी झाली. त्यानंतर मी असा निर्णय घेतला की स. सदस्य यांनी जी बुक दाखविलेली होती. एकाच व्यक्तीने एकाच दिवसात मोठया प्रमाणात दुकाने कशी तपासणी केली. तसेच फरक कसे आले. त्यावेळेस मी रिक्वेस्ट केली व त्यांनी ती मान्य केली त्याच वेळी पाच सहा पावतीवर टिक केले आणि त्या पावतीवर ती रक्कम कशी आली यासाठी त्या दुकानामधे जावून त्याचे मागच्या वर्षाचे जे काही इनपोट आहे आणि त्याच्या पेमेंटचा फरक काढण्याचे काम चालू आहे. मुख्य चौकशीसाठी थोडासा जास्तीचा वेळ लागेल . कारण पाचही दुकानमधे जावून सन २००४-०५ चे पूर्ण इनपोट तपासणी करून त्यांनी पूर्वी किती जकात भरलेली होती त्याचा फरक किती येतो. आणि फरकाप्रमाणे पावती दिली की नाही असा प्रश्न आहे. थोडासा वेळ लागत आहे. जे पाच च्या बाबतीत टिक करून दिलेले आहे व त्या संबधी ऑर्डर ही निघाल्या आहे की त्या पूर्ण दूकानामधे जावून अभिलेख तपासणी करावी. जे काही निदर्शनास येईल ते स. सदस्यांना कळविण्यात येईल.

श्री.मुजीब खान : चौकशीसाठी किती दिवस लागणार आहे याचा खूलासा करावा. १ वर्ष पूर्ण झाले. तसेच जे केमिकलवर एक रूपया प्रमाणे जकात घेतली जात होती ती संगणमत करून घेतली जात होती याची चौकशी झाली पाहिजे. ऑईलचे एका टॅकरची पावती दिली जात होती चार चार टॅंकर त्याच पावतीवर येत होते याची पण चौकशी झाली पाहिजे. गेटपास व किती टॅंकर येत होते,याची चौकशी व्हावी.

श्री. जगताप संजय : ज्यांनी जकातीचा ठेका घेतला त्यांनी सर्व स.सदस्यांना चांगली वागणूक द्यावी. अधिकाऱ्याच्या चूकीमूळे जे काही महापालिकेचे जकात वसूली करतांना नूकसान झाले असेल ते संबधीत जे दोषी असतील, जकात अधिक्षक असो की, उपआयुक्त असो. त्यांचे पगारातून कपात करण्यात यावे.

श्री. वसंत नरवडे : जकात खाजगीकरण झाले म्हणून जकातमधे झालेल्या चोरी उघडकीस येण्यास सूरूवात झालेली दिसते. आताच स. सदस्य श्री.मुजीब खान यांनी उपस्थित केल्याप्रमाणे गरवारे कंपनीचे दिवसातून १३ टॅकर येत असे जात असे तसेच २.७५ प्रमाणे जकात आकारणी करावयास पाहिजे होती तर १ रूपया प्रमाणे जकात आकारणी होत होती. १.७५ रू.प्रमाणे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण करणार आहे. जकातीचे जे नुकसान झालेले आहे ते कपंनीकडून वसूल करण्यात यावे अशी माझी मागणी आहे. १३ गाड्या दररोज येतात. लहान मोठ्या व्यापाऱ्यांना त्रास होतो. जकात खाजगीकरणात एका कंपनीला नफा मिळणार आहे. ८-८ तास गाड्या जकात नाक्यावर अडकलेल्या असतात. त्याची सोय करण्याची मागणी होत आहे.महानगरपालिकेचे झालेले नुकसान वसूल केले पाहीजे.

श्री.कोकाटे काशिनाथ : जकातीवर चर्चा होत असतांना वेळ वाया जावू नये. जकातीचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न करावे. जकात वसूलीसाठी खाजगी अभिकर्ता नियुक्त केलेले आहे. काही कंपन्यांची १%,२% बद्दल तक्रारी आहेत. माझ्या माहिती प्रमाणे जो चिकलठाणा एमआयडीसी भाग आहे. तेथे अनेक कच्चा माल येतो. त्यावर वेगळी जकात व तयार झालेल्या मालावर वेगळी जकात आकारली जाते. त्यामूळे चर्चा करीत असतांना अभ्यास पूर्वक झाली पाहिजे. कुणावर आरोप

प्रत्यारोप करणे बरोबर नाही. या सर्व बाबीची माहिती घेवूनच कार्यवाही करावी. त्या शिवाय कार्यवाही करू नये.

श्री.मुजीब खान : आम्ही अभ्यास करूनच बोलतो.

श्री.संजय जगताप : संबंधीतांच्या पगारातून वसूल करावे.

श्री. प्रशांत देसरडा :जेव्हा जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव मंजूरीसाठी सभागृहात आला तेंव्हा अनेक अडचणी येतील सभागृहात माहिती दिली होती. वादाचा विषय चालू आहे. महापालिकेने किती जकात वसूल करित होती व संबधीत ठेकेदार किती जकात वसूल करीत आहे. मी मा.महापौरांचे अभिनंदन करू इच्छितो, मा.महापौरांनी सांगितले की, संबधीत ठेकेदार जर जास्त जकात घेत असेल तर ठेका रद्द करण्याचे अधिकार या सभागृहाला आहे, याची नोंद इतिवृत्तांत घेण्यात यावी की, संबंधीत ठेकेदाराने जर जकातीच्या दरापेक्षा जास्त दर घेतले तर त्याचा ठेका रद्द करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की, ४% की, २% जकात घ्यायची. संबधीत जकात ठेकेदार हे व्यापाऱ्याला खालच्या दर्जाची वागणूक देत आहे. कोणत्याही व्यापाऱ्यांनी जर तक्रार केली व विनंती केली तर संबधीत ठेकेदार अरेरावीची भाषा करतात. खाजगीकरणापूर्वीचा कालावधीसाठी ठेकेदाराचे पासपोर्ट तपासणी केले तर ते दुबईला गेले होते. संबधीत ठेकेदाराची वागणूक कशी आहे त्याचें प्रमाणपत्र अदयाप प्रशासनाकडे दिलेले नाही. व्यापाऱ्याना चांगली वागणूक दयावी व वाजवी पेक्षा जास्त जकात आकारणी केल्याचे आढळून आल्यावर व त्याची पावती आपल्याकडे दिल्यानंतर संबधीताचा ठेका रद्य करावा लागेल जर त्याच्या पावत्या जास्त दराच्या आढळल्या तर याची नोंद घ्यावी.

मा.महापौर : ते आपले एजन्ट आहे. महापालिकेच्या नियमानूसार संबधीत ठेकेदार यांनी जकात आकारणी करावयास पाहिजे. जर वाजवी पेक्षा जास्त जकात आकारणी केली तर व तसा विषय सभागृहासमोर आला तर संबधीत ठेकेदाराचा ठेका रद्य करण्यास हे सभागृह सक्षम आहे.

श्री. प्रशांत देसरडा :संबधीत ठेकेदार यांनी आतापर्यत अनेक लोकाकडून जास्तीचे पैसे वसूल करून पून्हा त्या लोकांनी मागणी केल्यानूसार जास्तीचे घेतलेले रक्कम परत केलेली आहे.श्री.सुरे स.सदस्य यांचे बरोबर मी गेलो होतो. नाक्यावर ९ टन कोळसा आलेला होता परंतू संबधीत ठेकेदार यांचे कर्मचारी यांनी १० टन कोळसा आहे म्हणून जकात आकारणी केली व पावती दिली. संबंधीत सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला, आपण कमी जकात घेत होतो. संबंधीत ठेकेदार जास्त जकात घेतो. यापूर्वी जे जे जकात अधिक्षक झालेले आहे. त्यांनी त्याचे कालावधीत कोणत्या मालावर किती जकात घेतलेली आहे याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

(अनेक सदस्य एकाचवेळी बोलतात.)

श्री. अ. रशीद खान : संबंधीत ठेकेदार दुबईला गेले त्याचे प्रमाणपत्र नाही. ते कोणत्या गेंगचे आहे, खूलासा व्हावा. बेकरी ॲटम वर एक टक्का जकात घेतली जात असे आता दोन टक्का प्रमाणे घेतली जात आहे. अपिलामध्ये आले तर १% घ्यावे लागेल. चूक कोणाची आहे याची चौकशी करावी व संबधीतावर कार्यवाही करावी.

मा.महापौर : महापालिकेने नियम तयार करून दिलेले आहे. मा.आयुक्तांनी त्यावर आताच निर्णय दिलेला आहे. महापालिकेच्या वतीने जे १ टक्का प्रमाणे वसूल करण्यात येत असे ते चूकीचे होते आताच आयुक्तांनी मान्य केले आहे. संबधीत ठेकेदार २ टक्के जकात जे घेत आले नियमाप्रमाणे घेत आहे. असा मा.आयुक्तांनी खूलासा

केलेला आहे. मा.आयुक्तांचेही असे म्हणने आहे ४% घ्यावयास पाहीजे. परंतू असेही म्हटले आहे की, कमीत कमी २% तरी पाहीजे. असे त्यांचे खुलाशामधे म्हटले आहे.

(याच वेळी मा. महापौर डायस समोर स. सदस्य जमा होतात व काही सदस्य यांनीराजदंडास हात लावलेला होता. अनेक सदस्य बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

डॉ. भागवत कराड :काही सदस्यांनी राजदंड पळविण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यांचे सभासदत्व रद्य करावे.

मा.महापौर :सर्व स.सदस्यांना सूचना करण्यात येते की सर्वांनी आपआपले जागेवर बसावे.

श्री. संजय सिरसाट :जकात विभागाच्या संदर्भात स. सदस्य श्री. जगताप यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला . त्याचा अर्थ असा होत नाही की कुणी यायचे व राजदंडास हातात घ्यायचा . असे होत असतांना लगेच फोटो काढले जातात दुसऱ्या दिवशी लगेच वृत्तपत्रात येते त्यामूळे महापालिकेची बदनामी होते. स.स.श्री.संजय जगताप यांनी जो प्रश्न उपस्थित केला, त्यावर योग्य ती कार्यवाही करावी. कार्यवाही कुणावर करायची हा अधिकार सभागृहाचा ती आवश्य करा परंतू कोणत्याही प्रश्नावर चर्चा होत असतांना मा. महापौर यांचे डायससमोर स. सदस्यांनी जाणे बरोबर नाही. महापालिकेची जी बदनामी होत आहे ती थांबवली पाहिजे. यापूढे जो कुणी सदस्य कोणत्याही पक्षाचा असो. डायस समोर येवून राजदंडाजवळ आल्यावर त्यांचे सभासदत्व ताबडतोब रद्य करावे अशी विनंती आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जेव्हा खाजगीकरणाचा प्रस्ताव समोर आला त्यावेळी मी मत मांडले होते की खाजगीकरण करू नये तरी निर्णय घेतला. विविध मालावर जी जकात आकारली जाते,त्याचे दर प्रत्येक नाक्यावर लावण्यात यावे व त्याची प्रत सर्व नगरसेवकांना देण्यात यावी. हे दर प्रसिध्द करण्यात यावे. २५ रू.लोखंडाचा दर आहे, जकात वसूल कर्ता त्याचे दर रू.२८/- आहे, असे म्हणतो.

मा.महापौर :जकात दराबाबत शेडयूल ओ म्हणून एक पुस्तक आहे. यामधे संपूर्ण वस्तूची नावे दिलेली आहे. त्यावर किती जकात आकारणी करावयास पाहिजे हेही दिलेले आहे. या पूस्तकाच्या प्रति सर्व सदस्यांना देण्यात याव्यात तसेच ज्या व्यापाऱ्यांना हे पूस्तक हवे असेल त्यांची किमंत २५ रूपये आहे त्यांनाही उपलब्ध करून दिले जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:मूख्य ज्या वस्तू आहे दरराजच्या वापरात त्याचे जकातीचे दर किती आहे याचा तक्ता प्रत्येक नाक्यावर लावण्यात यावा अशी विनंती आहे असे आदेश करावे.

मा.महापौर :जो माल ,वस्तू दररोज नियमित येतात अशा वस्तूचे जकात दर किती टक्के आहे त्याचा तक्का प्रत्येक नाक्यावर लावण्यात यावा असे प्रशासनास अश्या सूचना करण्यात येते.स.सदस्य श्री. संजय जगताप यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता जकात वसूल कर्ता २% घेतो व आपण १% घेत होतो. त्या बाबतीत मा.आयुक्तांनी खूलासा केलेला आहे. एक टक्का जकात घेतली असेल नजर चूकीने होत असेल ती चूकच आहे परंतू त्यावर चार टक्के घ्यायला पाहिजे. परंतू प्रशासनाचेही मत आहे की त्यावर दोन टक्के जकात ध्यायला पाहिजे.बेकरी ॲटमवर जरी प्रशासनास वाटत असेल की चार टक्के घ्यायचे की दोन टक्के घ्यायचे . यापूढे दोन टक्के जकात घ्यावी अशी सभागृह मंजुरी देत आहे. यापूर्वी महानगरपालिकेने १ टक्का प्रमाणे वसूली केली नजर चुकीने झालेले असेल तरी महापालिकेचे नुकसानच झालेले आहे. यापूर्वी जे १ टक्का प्रमाणे वसूली केलेली

आहे मा. आयुक्तांनी या बाबतीत सविस्तर चौकशी करून किती नुकसान झालेले आहे, ते पहावे.

(याच वेळी मा.महापौर डायस समोर स. सदस्य जमा होतात व आपसात चर्चा करित असतात.)

मा.महापौर : यापूर्वी जितके १% प्रमाणे घेतलेले आहे, मा.आयुक्तांनी चौकशी करावी. व संबंधीत अधिकाऱ्याकडून वसूली करावी.

(यावेळी मा.महापौरांचे डायस समोर अनेक सदस्य जमतात. चौकशी करण्याबाबत बोलतात.)

श्री.कैलास गायकवाड :मा.आयुक्तांना चौकशी करू दयावी. अधिकाऱ्यांकडून वसूल करू नये. अहवाल आल्यानंतरच योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर : आताचे अधिकारी नाही. यापूर्वीचे देखिल जे अधिकारी होते, त्यासह चौकशी करून अहवाल या सभागृहापूढे ठेवावा.

(सभागृहात मा.महापौरांचे डायस समोर अनेक सदस्य जमतात. आपआपसात बोलतात. व्यापाऱ्याकडून वसूली झालीच पाहीजे अश्या घोषणा देतात.)

मा.महापौर : आपले मत मी लक्षात घेतो पण आपले अधिकारी यांनी १% घेतलेले आहे, चूकुन घेतलेले आहे की, जाणून बुजून घेतलेले आहे, याची चौकशी होवू द्यावी. वसूल कोणाकडून करायचे ही नंतरची गोष्ट आहे. अगोदर मा.आयुक्तांना चौकशी करू द्यावी की, आपल्या अधिकाऱ्यांनी १% जाणून बुजुन घेतली की, नजर चूकीने घेतली हे स्पष्ट होवू द्यावे.

(मा.महापौर यांचे डायस समोर अनेक सदस्य जमलेले आहेत व आपसात चर्चा करीत असतात.)

श्री.कैलास गायकवाड : जोपर्यंत अहवाल सभागृहात सादर करण्यात येणार नाही, तोपर्यंत अधिकाऱ्यांकडून कोणतीही वसूली करण्यात येवू नये. मा.आयुक्तांचा अहवाल आल्यावरच यावर निर्णय घ्यावा.

मा.महापौर : सर्वांना सूचना करतो की, आपआपले जागेवर बसावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : आज हनुमान जयंती आहे. विनंती आहे की, विषय पत्रिका घ्यावी.

श्री.गजानन बारवाल : ही चौकशी लवकरात लवकर व्हावी. विषय पत्रिकेला सुरूवात करावी. चौकशी किती दिवसात करणार.

(बरेच सदस्य आपसात बोलतात.)

श्री.मुजीब खान : गरवारेची देखिल चौकशी व्हावी. निर्णय घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा : विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.भागवत कराड : २% वसूली झाली पाहीजे मा.आयुक्तांना वाटते. पूर्वी २% प्रमाणे वसूली होत होती. मध्यंतरी १% प्रमाणे झाली. खूलासा घ्यावा.

मा.महापौर : अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते.

(दूपारी २.५० वाजता सभेला सुरूवात झाली.)

**विषय क्र. २१८/१ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे की, क्रांतीचौक येथे जालना रोडवर मराठवाडा एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून उड्डाणपुल बांधणे बाबत नियोजीत आहे.

क्रांतीचौक येथे जालना रोडमध्ये असलेल्या वाहतूक बेटात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे. क्रांतीचौक येथे बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित उड्डाणपुलाची लांबी अंदाजे ८००मी.एवढी असून रूंदी २० मी.एवढी आहे.क्रांतीचौक येथे उड्डाणपुल उभारण्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे तीन संकल्पचित्रे(Proposal)सादर करण्यात आलेली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

पर्याय क्र.१
शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून पुतळ्याखालून भुयारी मार्ग बांधणे.
पर्याय क्र.२
शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून पुतळ्याच्या एका बाजूस उड्डाणपुल बांधणे.
पर्याय क्र.३
शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून पुतळ्याच्या दोन्ही बाजूस उड्डाणपुल बांधणे.
वरील तिन्ही पर्यायापैकी एक उत्तम पर्याय निवडणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : शिवाजी महाराज पुतळयाजवळील रस्ता १०० फुट आहे. आणखी ४५ फुट रूंद केला तर उड्डानपूल करण्याची आवशकता नाही. २२-२२ फुट जागा देण्यास लोक तयार आहेत. विना खर्चाने एफएसआयच्या बदल्यात देण्यास पूर्ण बाजूचे लोक तयार आहेत. जागा भुसंपादन करण्याची गरज नाही. १.८प्रमाणे एफएसआय मागत आहे. यावर सभागृहाने विचार केला तर योग्य होईल. नसता शिवाजी महाराज यांचे पुतळयावरून उड्डानपूल बांधू शकत नाही. त्या पुतळयास काढून शकत नाही. राजकीय अडचण निर्माण होईल. भुयारी रस्ता केला तर तोही योग्य होणार नाही. पण विना खर्च एफएसआय नुसार देण्यास तयार आहे. मी म्हटल्याप्रमाणे केल्यास चार पदरी रस्ता होईल. अपघात होण्याचीही भिती राहणार नाही. बाबा पेट्रोल पंप ते मोढा नाका पर्यत रस्ता रूदींकरण करावे. सदर पुतळा न हटविता आता म्हटल्या प्रमाणे शिवाजी महाराज याचा आदर करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : दोन सभापूर्वी हा विषय विषयपत्रिकेवर होता, यावर सखोल अभ्यास करून निर्णय घेतला जाईल असे म्हटले होते. आपल्या दालनात प्रेझेंटेशन दाखवण्यात आले. पून्हा आजच्या सभेला विषय सादर केलेला आहे. चर्चेला सुरूवात करण्यापूर्वी जे तीन पर्याय ठेवलेले आहे . ते कशा पध्दतीने आहेत उड्डानपूल कोणत्या साईडने घेतल्यानंतर पुतळा कशा प्रकारे दिसेल त्याचप्रमाणे भुयारी मार्ग काढून केल्यावर कसा दिले एक साईडने उड्डाणपूल घेतल्यानंतर कसा दिसेल. या संबधीचे जे चित्रफित दाखवणार आहे ती दाखविण्यात यावी अशी विनंती आहे त्यानंतर सविस्तर चर्चा करता येईल. अशी मी विनंती करतो.

मा.महापौर : रस्ते विकास महामंडळाच्या वतीने सभागृहाला प्रेझेंटेशन देण्यांत यावे.

(याच वेळी सभागृहात तीनही पर्यायाने उड्डानपूल केल्यानंतर तेथील पूतळा व इतर स्थळ कशा पध्दतीने राहील, याबाबत स्तुप कंसल्टंटचे प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य विकास मंडळ करिता ते काम करतात, त्यांनी चित्रफितीच्या साह्याने (डिस्प्ले) सभागृहास माहिती देण्यांत आली.)

श्री..कचरू मोरे : आज महाविर जयंती आहे उद्या १४ एप्रिल आहे. वार्डात अनेक ठिकाणी कार्यक्रम आहे. आजची सभा तहकूब करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :आजची सभा तहकूब करावी. १९ तारखेला सभा आयोजित करावी.

मा.महापौर : महत्वाचा विषय चालू आहे. एवढा विषय होवू द्या. मुंबईहून रस्ते विकास महामंडळातर्फे लोक आलेले आहेत. त्यांचे काय म्हणने आहे ते समजून घ्यावे. ऐकून घ्यावे, त्यानंतर आपण चर्चा करू.

श्री.काशिनाथ कोकाटे : रस्ते विकास महामंडळातर्फे संबंधीत अधिकारी श्री.जोशी,श्री.देशमुख यांनी रस्त्यावर रहदारीची संख्या,वाढ किती,कोणत्या चौकातून कोणत्या दिशेला वाहन जाणार, किती प्रमाणात रहदारी होईल याची माहिती दिली. मा.आयुक्तांनी खूलासा केला आहे की, जालना रोड महाविर चौकापासून

मुकूंदवाडीपर्यंत ५ उड्डाणपुल होते, त्यामध्ये कपात झाली नाही, असे सूचवायचे आहे का.

श्री.हिम्मतराव दाभाडे : उदया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयती आहे सर्वांना विविध कार्यक्रमासाठी जायचे असल्याने आजची सभा तहकूब करावी. अशी विनंती आहे.

मा.आयुक्त : शासनाकडून जे मागील चार वर्षापासून २३.५० कोटी रक्क्म येणार होती आली नव्हती. त्यामूळे एमएसआरडीसीने १६७ कोटीचे कामे कपात करून १०८-०९ कोटीचीच कामे प्रस्तावित केली होती. परंतू मार्च अखेर त्या विभागास २३.५० कोटी रूपये मिळालेले आहे. परत टॅक्स अधारे ५४ कोटीचे व बँकेचे कर्ज सूध्दा मंजूर झालेले आहे. पण आता सध्या कोणत्याही प्रकारची कपात नाही. दोन रस्ते करण्याचे सूचवले होते ते नागपूरच्या धर्तीवर करण्यात यावे. त्यात महावीर चौक ते चिकलठाणा एक्झीटपर्यंत तसेच रेल्वेस्टेशन ते हर्सूल टी पॉईट पर्यतचे रस्ते आहे. या प्रस्तावाची कार्यवाही वरील स्तरावर आहेत. कपात करण्याचा प्रश्न यामूळे नाही की शासनाने २३.५० कोटी रिलीज केले. पण भविष्यात कपात होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत निर्णय झाला नाही, कारण हे सर्व २००३-०४ च्या रेस प्रमाणे आहे. आता समोर जो प्लायवर सूरू होत आहे. तो पाच ते सहा दिवसात सुरू व्हायला पाहिजे. त्याची किमंत दोन कोटी होती परंतू ती आता ६ कोटीपर्यत गेलेली आहे. थोडीशी कपात होण्याची शक्यता आहे परंतू आतापर्यत शासनाकडून निर्णय झाले नाही.पूर्वी कपात करण्याचा निर्णय होता. त्यावेळी शासनाकडून पैसे दिले नव्हते. म्हणून १६७ कोटीचे कमी करून १०८-१०९ कोटीचे करणार होते. परंतु आता तितकी कमी करण्याची गरज भासणार नाही.

श्री. संजय जोशी :२०००-०१ मधे डॉ. भागवत कराड महापौर असतांना १६७ कोटीचा प्रोजेक्ट तयार केला होता. त्यावेळी ५ उड्डाणपुल त्यात दोन रेल्वेचे फ्लायओव्हर होते. पाच सब-वे होते. त्यावेळी या कामासाठी १६७ कोटी मंजूर झाले होते. सन २००३-०४ ला याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.या १६७ कोटीमधे मोठा फरक आला. २००७ मध्ये काम करणार आहोत. जो फरक पडणार आहे तो शासनाकडून मिळाणार आहे का याचा खूलासा व्हावा. जो प्रोजेक्ट होता तो पूर्णपणे यशस्वी करणार आहात का?शासनाकडून एवढे पैसे मिळणार आहेत काय? महत्वाचेच उड्डाण पूल करावयाचे झाल्यास कोणते करणार आहोत. याचा खुलासा आयुक्तांनी करावा. शासनाकडून मिळणार नाही. आपणांस त्याचे प्रायरेटी ठरवावी लागेल. याचा खूलासा व्हावा.

श्री.प्रशांत देसरडा :सविस्तर माहिती या उड्डानपुलाच्या संदर्भात दिली. सेव्हनहिल येथील उड्डान पूल करते वेळेस श्री.एच.एम.देसरडा न्यायालयात गेलेले होते. जोपर्यंत जालना रोडला समांतर रस्ता होत नाही, तोपर्यत उड्डानपूल करू नये अशी त्याची भुमिका होती. नवीन बसस्टॅण्ड ते जूने बसस्टॅण्ड हा समांतर आहे तो रस्ता अगोदर पूर्ण करावा हा जालना रस्त्याला पॅरलल रस्ता आहे. उड्डाणपुलही करावे. आताच दाखविण्यात आले की २३ टक्के वाहने ही खालच्या बाजूला येतात. ही रहदारी शिवाजी हायस्कूल मार्गे जाईल.उड्डाणपूल करण्यास हरकत नाही. या संदर्भात सर्व पदाधिकारी एकत्रित बसून योग्य जो निर्णय वाटेल तो घेण्यात यावा. आणि आज हनुमान जयंती तसेच उदया आंबेडकर जयंती असल्यामूळे ही सभा तहकूब करावी.

श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ :ठराविक लोकांनी बसून निर्णय घेणे योग्य होणार नाही हे जनतेसमोर जायचे आहे. आणि प्रत्येकाला या विषयावर मत मांडायचे आहे.शिवाजी महाराज हे ठराविक पदाधिकारी यांचे नव्हते ते सर्वाचे होते. हे सेन्सेंटीव्ह विषय आहे. यावर सर्वांनी विचारपूर्वक सखोल चर्चा करावी. यावर निर्णय घ्यायचा असेल तर सभा चालू ठेवावी. जर विनंती असेल तर सभा तहकूब करावी.

मा.महापौर :या विषया संदर्भात आज निर्णय घ्यायचा आहे. सभा किती वेळ चालू राहिली तरी चालेल ज्यांना कामे असतील त्यांनी जावे. ज्यांना चर्चा करायची असेल त्यांनी चर्चा करावी. मागिल ६ महिण्यापासून हा प्रस्ताव आलेला आहे. या संदर्भात एनओसी दयायची आहे. सभागृह जो निर्णय देईल तो मान्य असेल त्याप्रमाणे निर्णय देईल. तीन पर्याय प्रस्तावात दिलेले आहे त्यापैकी एका संदर्भात निर्णय घ्यायचा आहे. त्यावर चर्चा करावी.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : शिवाजी महाराज यांचा पूतळा न हलविता Vision कमी न करता दोन्ही साईडने रस्ता करता आला तर सोयीस्कर होईल असे वाटते .

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :आजही पूतळयाची उंची जास्त आहे. त्या पूतळयावर वयोवृध्द व्यक्ती जावू शकत नाही तरून व्यक्तीच वर जावू शकतो. ११मीटरचे प्रपोजल दिले. दोन्ही बाजूने उड्डान पूल केल्यास आणखी ११ मीटर उंची वाढेल त्यानुसार ३३ फुट आणखी उंची वाढेल. यामध्ये लोकांच्या भावनेचा विचार करून पूल तयार करावे. ३० लाखही जातील जसे ब्रीजचे काम पूर्ण होईल. टोल टॅक्स लागेल. वाहन चालकावर बोजा पडेल. १०० रू. गाडी गेली तर घेतील. शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आदरणीय महापूरूष आहे. त्याचा पुतळा न हलविता दोन्ही बाजूने डड्डान पूल जे खालचा पर्याय आहे त्याप्रमाणे करावे. पुल केल्यानंतर ही गाडी मालकास त्यांचा बोजा पडणार आहे. जे पाच पैकी अति आवशक ब्रीज हा महावीर चौक येथे होणे गरजेचे आहे.कारण जो माल शहरात येतो व बाहेरही महाविरचौकातूनच जातो. तेथे जास्त ट्राफिक आहे.

मा.आयुक्त :महावीर चौकात पूल का होत नाही त्याचे कारण असे की तेथे तेव्हढी वाहतूक नाही. तसेच समोरची जागा ही छावणीची असल्यामूळे ती महापालिकेस मिळत नाही. क्रांती चौक येथे करणे गरजचे आहे येथे ट्राफिक घनता जास्त आहे. करणे गरजेचे आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मुख्य ब्रीज महाविर चौकाचा आहे. तेथे प्रथम होणे आवश्यक आहे. ते सोडले.

मा.महापौर : जो प्रस्ताव समोर आलेला आहे त्यापैकी कोणता पर्याय निवडायचा त्यावर चर्चा करावी. एम.एस.आर.डी.सी. ला आपण कळविले. पुतळा न हलविता करावे. त्यांनी हे ३ प्रस्ताव दिले त्यावर करावे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :पूल करतांना बाजूची बॅकेची इमारत तोडावी लागणार आहे. खर्च दयावा लागेल. नसंता वाहतूकीस रस्ताच होणार नाही.किंवा भूयारी मार्ग करणे योग्य आहे काय?ते पण बघावे.

श्री. अ. रशीद खान : भुयारी रस्ता करणे शक्य नाही. पुतळा वर करून दोन्ही बाजूने उड्डाणपूल केल्यास योग्य होईल. तसेच मंनमंदीर पर्यत व त्यापूढे जेथे पदमपूरा कडून रस्ता येतो तेथपर्यत उड्डाण पूल केल्यास योग्य होईल. जेंव्वढा पूतळा वर करता येईल तेवढी शान या शहराची राहील.

श्री. अबूबकर अमोदी : भुयारी मार्ग करण्यात येवू नये, पावसाळ्यात पाणी साचेल. ते काढण्याची काय उपाय योजना आहे. या ठिकाणी भूमीगत नहर आहे. शिवाजी

महाराजांचा पुतळ्याचे काम चालू होते, त्यावेळी ६ दिवस नहर बंद केली होती. सिमेंट काँक्रीट टाकून बंद केली होती. दोन्ही बाजूने उड्डाणपूल केल्यास योग्य होईल.

श्री. नरवडे वसंत :भुयारी मार्ग करणे योग्य ठरणार नाही. जर वरील मार्गाने पूल करायचे झाल्यास त्या पूलाच्या वरून जाणारी वाहने यामूळे शिवाजी महाराज यांचे पूतळयाची कुठल्याही प्रकारची विटंबणा होणार नाही. याची दक्षता घेतली नाही तर शहरात कुठेही केंव्हाही काही घडू शकते. तसेच स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी म्हटल्या प्रमाणे या भागात १४५ फुटाचा रस्ता उपलब्ध होत असतांना तेथे उड्डाण पूल करण्याची गरज काय ?याचा विचार करावा. ४५ फुट जागा ही डी.पी रोडला मिळू शकते फक्त एफएसआयचे परवानगी दयावी. महापालिकेला खर्च ही लागणार नाही व या उड्डाणपूलाचा हा खर्च महावीर चौक येथे करण्यात यावा. जालनाकडे जाणाऱ्या वाहनाचा प्रश्न सूटणार आहे परंतू येथे पूल करून इतर साईडचे रस्ते अरूंदच राहणार आहे. महापालिकेच्या माध्यमातून सर्वे करावा की साईडने ४५ फुट जागा मिळते का? बघावे. या ठिकाणी पूल न करता महावीर चौकात करावे असे माझे मत आहे.

मा.आयुक्त : कोठे कोठे असे पूल करणे आवशक आहे. या संबधी एमएसआरडीसी कडून सर्वे केला जातो की किती वाहने कोणत्या बाजूने येतात. याचा सर्वे केल्यानंतर तेथे पूल करणे गरजेचे आहे की नाही हे ठरविले जाते. महाविर चौक मधे ट्राफिक जास्त नाही म्हणून तेथे पूल करण्याची गरज नाही. परंतू क्रांतिचौक येथे करणे गरजेचे आहे. तेथे ट्राफिक काऊट जास्त आहे. हे सर्व नियोजन जे केले आहे ते १६७ कोटीची स्कीम नियोजित होत होती. त्यावेळी कुठे कुठे गरज भासेल हे त्यावेळी संबधीत विभागाने नियोजीत केलेले आहे. जागेची अडचण येणार नाही दोन तीन जागा आहे त्यांना एफएसआय घेवून ती जागा पूढे सोडलेली आहे. यावर निर्णय घेतला तर चार पाच महिण्यात संबधीत विभाग काम करण्याच्या स्थितीमधे येवू शकेल.

डॉ.भागवत कराड : सन २००० मधे या शहरात पाच उड्डाणपूल दोन रेल्वे फ्लाय ओव्हर व तीन भुयारी रस्ते करावे म्हणून ठराव मंजूर केलेला होता. नंतर या उड्डाण पूलाची गरज आहे की नाही म्हणून ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ ट्रॉफिक ऑफ रोडस या संस्थेचे मुबईचे दोन अधिकारी येथे आले होते. शहरात ७ दिवस होते. त्यांच्या रिपोर्टनुसार या शहरात उड्डाण पूलाची आवशकता आहे. त्यामधे क्रांतीचौक,हॉटेल प्रेसिडेंड पार्क, सेव्हन हिल येथील किंवा महावीर चौकातील उड्डाण पूल असेल किंवा महापालिकेच्या जवळचा टाऊन हॉल येथील उड्डान पूल असेल पाचही उड्डाण पूलाची गरज आहे. असा रिपोर्ट दिल्लीच्या ट्रॉफिक इन्स्टियूटचा रिपोर्ट महापालिकेकडे आहे. काही सदस्यांनी मत व्यक्त केले की रस्ता रूंद केला तर उड्डाण पूलाची गरज आहे का. परत एकदा तपासून पाहण्याची गरज आहे. उड्डाण पूल बांधायचा असेल तर तीन पर्याय दिले आहे. पुतळा उंच करू नये कारण प्रत्येकांची अपेक्षा असते कार्यकर्ता वयोवृध्द असेल तरून असेल, कोणत्याही संघटनेची किंवा पक्षाची मिरवणूक असेल त्यावेळी शिवाजी महाराज यांचे पूतळयास हार घालून अभिवादन करून काढली जाते. त्यामूळे पूतळा जास्त उंच नसावा जे की कोणासही इच्छा झाली तर त्यांना हार घालता आला पाहिजे. माझे मत असे की दोन्ही बाजूने उड्डाण पूल करावे व पूलामधे अंतर जास्त ठेवावे त्यामूळे पुतळा उंच करण्याची गरज पडणार नाही.

जर मनमंदिर पूढे उड्डान पूल जाणार असेल तर पदमपूरा कडून येणारा रस्त्यापर्यत करावे जेणे करून तेथीलही ट्राफिक सुरळीत होण्यास मदत होईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आहे आज कार्यक्रम आहे. आजची सभा तहकूब करावी. अशी विनंती. आहे.

मा. महापौर : सभा तहकूब होणार नाही. महत्वाच्याविषयावर चर्चा चालू आहे. ज्यांना बाहेर जायचे असेल त्यांनी जावे.

(याच वेळी सभा तहकूब करावी म्हणून स.सदस्य डायस समोर जावून मागणी करतात मोठमोठयाने बोलातात काही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. कोणीही डायस समोर येवून बोलू नये.

श्री. संजय सिरसाट :सभा तहकूब करू नये महत्वाच्याविषयावर बोलायचे आहे.

श्री. गजानन बारवाल :पर्याय क्र २ नूसार त्या प्रमाणे दक्षिण बाजूने महापालिकेने मोठी जागा लिज वर दिलेली आहे.ते लिज रद्द करून त्या साईडने पूल बांधला तर जागा सुध्दा महापालिकेच्या ताब्यात येईल. कोणलाही त्रास होणार नाही. महापालिकेला खर्च सूध्दा जागेसाठी येणार नाही.

श्री. रेणूकादास वैद्य :माझे वैयक्तिक मत असे की सध्या तरी त्या ठिकाणी उड्डाणपूलाची आवशकता नाही. शिवाजी महाराज यांचा पूतळा हे आपले सर्वाचे श्रध्दा स्थान आहे. तो पूतळा न हलविता महाविर चौक किंवा मोढा नाका येथे उड्डाणपूल केल्यास वाहतूकीवर कन्ट्रोल होवू शकेल. अशी विनंती आहे.

मा.आयुक्त :क्रांतीचौक येथे उड्डाणपूल करण्याची आवशकता आहे तेथे ट्राफिक जास्त आहे. सर्व तपासणी करून कार्यवाही केलेली आहे तांत्रिक दृष्टयाकरणे आवशक आहे.पुन्हा तपासण्याची आवशकता नाही असे माझे मत आहे.

श्री. रेणूकादास वैद्य :क्रांतिचौक या ऐवजी ट्राफिकचा विचार करता महावीर चौक किंवा मोढा नाका येथे उड्डाण पूल करण्याची आवशकता आहे असे माझे वैयक्तिक मत आहे.

श्री.मुजीब खान : तीन पर्याय ठेवलेले आहे. डीपी रोड किती फुटाचा आहे.रस्ता रूंद होत असेल तर उड्डाणपूल करण्याची आवशकता आहे का?उड्डानपूल केल्यास अनेक ट्रक चालक हे रात्रीच्यावेळी पिलेले असता एखादया वेळेस नशेत असतांना वाहन कन्ट्रोल झाले नाही व पुतळयाची विंटबना झाली तर शहरात दहशतीचे वातावरण निर्माण होवू शकते. भूयारी मार्ग केल्यास योग्य होणार नाही. जेंव्हा शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणयात आला त्यावेळी खोदकाम केले मोठा पाण्याचा प्रवाह होता. काम करणे कठीण झाले होते. आता भुयारी मार्ग केल्यास पून्हा पाणी प्रवाह होण्याची शेक्यता आहे. माझी विनंती की डी. पी रोड नूसार दोन्ही साईडने रस्ता तयार करावा. पुतळा आहे तसाच ठेवावा. अगोदर हा खुलासा अपेक्षीत आहे की डी. पी प्लॅन नूसार रस्ता किती रूंद आहे. ऑलरेडी साइडने रस्ता रूंद करण्यास जागा असेल तर इतर बाबीवर विचार करण्याची गरज नाही.

मा.आयुक्त : ४५ मीटर डी. पी रस्ता आहे. जागा उपलब्ध होवू शकते. जे चार पाच मिळकती आहे आपल्या ताब्यात नाही. तेही मोबदला देवून घ्यावी लागेल.

श्री. मुजीब खान :आताच खूलासा केला. याचा अर्थ तेथे जागा असतांना उड्डाण पूल करण्याची आवश्यकता नाही. फुटपाथ सह रस्ता करावा. त्या ठिकाणी पुतळा नसता तर कुणाचे दुमत नव्हते.परंतू लोकांच्या भावनेचा प्रश्न आहे. उड्डाण पूल केल्यास पुतळा मध्ये येणार आहे. लोकांच्या भावनेचा विचार करून निर्णय घ्यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : तीन पर्याय समोर आलेले आहे. महापालिकेचा १४५ फुटाचा डी. पी रस्ता आहे हा पर्याय जरी समोर असला तरी पैठण गेट कडून रेल्वेस्टेशन कडे जाणाऱ्या ट्रॉफिकचा विचार करावा लागणार आहे. केवळ पूर्व व पश्चिम बाजूचाच विचार करून चालणार नाही. ४५ मी. केला तर सौंदर्यीकरण होईल. ओव्हरब्रीज केल्यावर ३३ फुट खाली जाईल. भूमीगत केले तर ३.५ जाईल व काम करणे अवघड होईल. २८ मी. चा पर्याय स्वीकारण्यात यावा.

सौ. लता दलाल :पूतळा न हलविता व सदर चौकाचे कोणतेही सौदयीकरण नष्ट न होता दोन्ही बाजूने उड्डाण पूल होत असेल तर हरकत नाही. या पूलाचा खर्च जनतेच्या माथी टाकला तर तो सहन करणार नाही. पथकर म्हणून कूणीही येथील नागरीक कर भरणार नाही. त्यास आमचा विरोध असणार आहे.दोन्ही बाजूने उड्डाणपूल करण्याची मागणी केलेली आहे त्या प्रमाणे करावी किंवा स. सदस्य श्री. बारवाल यांनी म्हटल्या प्रमाणे दक्षिण बाजूने महापालिकेची जागा आहे त्यामूळे जास्त खर्च करण्याची गरज नाही. त्या बाजूने रूंदी वाढून त्या नुसार महावीर चौका पासून ते पूढे घेण्यात यावा.

श्री. वसंत नरवडे : डी. पी प्लॅन मध्ये आलेल्या सर्व जागा महापालिकेस घेण्याचा अधिकार आहे. जागा संपादीत करायच्या असतील तर कायदयाप्रमाणे करता येते.

मा. महापौर : एकूण १४५ फुट रस्ता तेथे आहे त्या प्रमाणे तेथे जागा लागणार आहे मा.आयुक्तांनी खूलासा केलेला आहे.

मा. आयुक्त :सध्या तेथे ४५ मीटरचा डी.पी.आहे. ४५ मीटरचा डी.पी.रूंदीकरण करून रस्ता रूंद झाला,तरीही उड्डाणपूल करण्याची गरज यामूळे भासत नाही की, कोणताही चौक असेल तेथे ट्राफिक जास्त आहे. तेथे सर्वसाधारणपणे एक तासाच्या आत ९ हजार पेक्षा जास्त व्हिकल क्रॉस करू शकत नाही. ट्राफिक न थांबता सरळ जाईल. जरी रस्ता रूंद झाला तरी चौक राहणारच आहे. चौक राहीला, एक पर्टीकुलर ट्राफिकला उड्डाणपुल लागतोच. उद्या ४०० फुटाचा रस्ता झाला तरी क्रॉस होत असेल तर करावेच लागेल.

श्री. तरविंदरसिंग धिल्लन :पुतळा जशाच्या तसा ठेवून दोन्ही बाजूने उड्डाण पूल करावे.

श्री. नरवडे वसंत :पाण्याची पाईप लाईन आहे ती शिफ्ट करण्याचा खर्च कोण करणार आहे. महापालिका करणार असेल तर तरतूद आहे का ?

मा.आयुक्त : महापालिकेस जागा उपलब्ध करून देणे तसेच ज्या सर्वीस लाईन आहे त्या स्थलांतरीत करावे लागतील.

श्री. नरवडे वसंत :शहराच्या विकासासाठी ठेवलेली रक्कमेतून तरतूद कमी करण्यात येवू नये.

मा. आयुक्त : हा पैसाही शहराच्या विकासाठीच खर्च होत आहे. कमी रक्कम खर्च करून जास्त रक्कमेची कामे होत असेल तर काय हरकत आहे.

श्री.नरवडे वसंत : शहरातील लोकांचे प्रश्न कोण मिटवणार आहे. शहरातील विकासासाठी ठेवलेली रक्कमेतून तरतूद कमी करू नये.

मा.आयुक्त : त्या रस्त्याने शहरातीलच लोक जाणार आहे.

श्री.नरवडे वसंत : वाहतूकीचा त्रास सहन करू. परंतु या कामासाठी जो खर्च लागणार आहे, त्यासाठी तरतूद करावी. ५-१० लक्ष खर्चात काम होणार नाही. जास्त खर्च येतो.

मा.आयुक्त : रस्त्याच्या तरतूदीतुन रक्कम वर्ग करू. दोन त अडीच कोटी खर्च करून २० कोटीची कामे करून मिळणार आहे. १६७ कोटीची स्कीम आली, त्यावेळी सर्वसाधारण सभेने सर्व कामांना मान्यता दिलेली आहे. त्याची पध्दत पण मंजूर

केली. त्यात ८९ कोटीचा टोलनाका म्हणून बाहेरून येणाऱ्या ट्राफिकला लागणार आहे. इंटरनल ट्राफिकला कर लागणार नाही.

मा.महापौर : सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून त्याचे सुशोभिकरण करण्यात यावे व पुतळ्याच्या दोन्ही बाजूस उड्डाणपूल बांधण्यात यावे. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेशी चर्चा करून शक्य असेल तर मनमंदिर पर्यंत पूढे ५०० मीटर वाढविण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून त्याचे सुशोभिकरण करण्यात यावे व पुतळ्याच्या दोन्ही बाजूस उड्डाणपूल बांधण्यात यावे, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेशी चर्चा करून शक्य असेल तर मनमंदिर पर्यंत पूढे ५०० मीटर वाढविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९/२ :**

दिनांक १७.०३.२००६ रोजी संपन्न झालेल्या प्रभाग समिती **ड** च्या सभेने प्रस्ताव क्र.३/१ अन्वये दिनांक १३,१४ फेब्रुवारी २००६ रोजी प्रभाग समिती **ड** चे सदस्य आणि अधिकाऱ्या समवेत हैद्राबाद व चेन्नई शहराच्या स्वच्छतेबाबत अभ्यास दौरा करण्यात आलेला आहे. अभ्यास दौऱ्याचा पाहणी अहवाल प्रभाग समिती सभेच्या माहितीस्तव व योग्य त्या निर्णयास्तव सादर करण्यात आला असता,प्रभाग समिती **ड** ने निर्णय घेतला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतील प्रभाग समिती **ड** च्या कार्यक्षेत्रातील स्वच्छतेचे काम प्रायोगिक तत्वावर हैद्राबाद, चेन्नई धर्तीवर खाजगी संस्थाकडून करून घेण्यास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. कैलास गायकवाड : खाजगीकरण होता कामा नये. मागासवर्गीयांच्या विरोधात आहे. चतूर्थश्रेणी कामगांरावर गदा येणार आहे. खाजगीकरणाचा प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री. वसंत नरवडे :कुठल्याही कर्मचाऱ्यावर गदा येणार नाही. जे सेवेत आहे ते सेवेत राहतील आम्ही जो अभयास केला हैद्राबाद चेन्नई आपल्या पेक्षा १० पट लोकसंख्या असलेले शहर आहे शहराच्या साफसफाई विषयी धोरण आखणे, कॉन्ट्रक्ट पध्दतीने काम घेतले जाते ते वाखानण्याजोगे होते म्हणून हे प्रायोगिक तत्वावर करावे येथिल कर्मचारी इतर ठिकाणी शिफ्ट करता येतील. जेथे कमी आहे तेथे मिळतील आपल्याला नविन पदे निर्माण होणार नाही. हा प्रस्ताव मंजूर करावा अशी सभागृहास विनंती आहे.

मा. महापौर : सदर विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १७.०३.२००६ रोजी संपन्न झालेल्या प्रभाग समिती **ड** च्या सभेने प्रस्ताव क्र.३/१ प्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतील प्रभाग समिती **ड** च्या कार्यक्षेत्रातील स्वच्छतेचे काम प्रायोगिक तत्वावर हैद्राबाद, चेन्नई धर्तीवर खाजगी संस्थाकडून करून घेण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/३ :**

दिनांक ०१/०४/२००६ रोजी संपन्न झालेल्या शहर सुधार समिती सभेमध्ये विषय क्र.५ अन्वये मौजे पहाडसिंगपुरा येथील सर्व्हे नंबर ४२/४ चे मिळकत आणि सर्व्हे नंबर ३७/पैकीचे मिळकत तसेच मौजे हिमायतनगर येथील स.न.९८/पैकीचे मिळकत भूसंपादन करणेस १६०० चौ.मी. ऐवजी १६०० रनिंग मीटर व भूसंपादनाचा खर्च रू.१०.०० लक्ष ऐवजी २.१० कोटी अशा दुरूस्तीसह मंजुरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**<u>प्रशासनाचा मूळ प्रस्ताव दुरूस्तीसह खालीलप्रमाणे आहे.</u>**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे पहाडसिंगपुरा येथील सर्व्हे नंबर ४२/४ चे मिळकतधारक श्री.भालचंद्र एल.गोटे आणि सर्व्हे नंबर ३७/पैकीचे मिळकतधारक श्री.शितलचंद एस.डहाळे तसेच मौजे हिमायतनगर येथील स.न.९८/पैकीचे मिळकतधारक सेक्रेटरी, स्वयमसिध्द गृह निर्माण संस्था आणि अध्यक्ष जिल्हा परिषद शिक्षक गृह निर्माण संस्था यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-१२७ अन्वये शहराच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत जमीनीसाठी खरेदी सूचना दिली आहे.

उक्त मिळकत धारकांनी औरंगाबाद शहर (वाढीव हद्द) या मंजुर विकास योजनेतील २४.०० मीटर रूंद रस्त्यामधील बाधीत क्षेत्रासाठी खरेदी सूचना दिली आहे. वरील खरेदी सूचना दिलेल्या मिळकतधारकांच्या जमीनीचे भागश: क्षेत्र उक्त २४.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत होत आहे. आरक्षणाचा हेतू साध्य करणेस्तव उक्त २४.०० मीटर रूंद रस्त्याचे पूर्ण लांबीसाठी भूसंपादन करणे जरूरीचे आहे. उक्त रस्त्यात मौजे पहाडसिंगपुरा येथील स.न.३७,३८,३९,४१ आणि ४२ तसेच मौजे हिमायतनगर येथील सर्व्हे नंबर ९८,९९,१०६ आणि १०८ मधील जमीन बाधीत होत असून एकूण अंदाजे १६००.०० रनिंग मीटर असून भूसंपादनाचा अंदाजे खर्च रूपये २.१० कोटी अपेक्षित आहे.

वरील खरेदी सूचना पैकी प्रथम प्राप्त खरेदी सूचना दिनांक ०१.१२.२००५ ची असून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनिमय-१९६६ मधील तरतुदीनुसार सहा महिन्याच्या आत भूसंपादन कार्यवाही करणे आवश्यक आहे. नाही तर खरेदी सूचनेतील आरक्षणाने बाधीत जागा व्यपगत होते. सबब दि.३१.५.२००६पूर्वी भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

सबब प्रकरणात पुढील कार्यवाही होणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवून प्रकरणात भूसंपादनास लागणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री. संजय जोशी : हा अत्यंत गंभीर विषय असून त्या प्रस्तावाविषयी माझेकडे बरीचशी माहिती व कागदपत्रे उपलब्ध आहे सविस्तर माहिती आपल्या समोर ठेवत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष दयावे. मा.आयुक्तांनी लक्ष द्यावे.

श्री.संजय सिरसाट : हा प्रश्न माझ्या सुध्दा जिव्हाळ्याचा आहे. पदाधिकारी म्हणून मी भोगलेले आहे. विषयावर चर्चा सूरू होण्यापूर्वी मा. आयुक्त यांना काही प्रश्न विचारावयाचे आहे.

श्री.संजय जोशी : सामान्य सदस्यांना आगोदर बोलू दयावे मी अगोदर सूरूवात केलेली आहे. सभागृह नेता यांनी नंतर बोलावे.

(यावेळी स.सदस्य श्री.संजय जोशी,स.श्री.संजय शिरसाट व इतर स.सदस्यांचे आपआपसात मोठमोठयाने बराच वेळ बोलणे चालू असते.)

श्री.महेश माळवतकर : स.सदस्य श्री. संजय जोशी यांनी अगोदर या विषयावर चर्चेला सूरूवात केलेली आहे त्यांना बोलू दयावे.

श्री.संजय सिरसाट : मा.आयुक्त यांना एक प्रश्न विचारायचा आहे. माझ्यानंतर स. सदस्य यांनी त्याचे मत मांडावे. प्रस्ताव जेंव्हा सभागृहात विषय पत्रिकेवर आला तो पूर्णपणे मा.आयुक्त यांनी वाचलेला आहे का? (बरेच सदस्य आपसात बोलतात) हा प्रस्ताव नगररचना विभागाकडून शहर सूधार समितीच्या मार्फत या सभागृहासमोर आलेला असून जो प्रस्ताव प्रशासनामार्फत येतो त्याची संपूर्ण माहिती मा.आयुक्त यांना असते असे गृहीत धरतो. या प्रस्तावा संबधी काही कागदपत्रे स.संजय जोशी यांचेकडे आहे ते सर्व कागदपत्रे माझ्याकडे प्राप्त झाले आहे. रेकॉर्डवर यासाठी घेणे आहे की, एखादा ठराव चूकीने आला व त्यावर निर्णय झाला त्याची जबाबदारी ही सर्वसाधारण सभेवर येते. प्रशासनाने हा प्रस्ताव आणलेला आहे याची पुरेपूर कल्पना मा.आयुक्तांना आहे काय याचा खूलासा करावा.

मा.महापौर : प्रशासनाकडून हा प्रस्ताव आलेला आहे, याची आपणास माहिती आहे का?

मा.आयुक्त :जी संचिका माझ्याकडे आली होती ती मंजूर केली होती त्याप्रस्तावामध्ये किमत ही १० लक्ष होती. तसा प्रस्तावावर सही करून पाठविलेला होता. जेंव्हा शहर सुधार समितीमधे चर्चा झाली त्यावेळी मी नव्हतो. परंतू त्यावेळी चूक निदर्शनास आली हे आताच मला सांगण्यात आले व शहर सूधार समिती मधे १० लक्ष ऐवजी त्याची किमत २.१० कोटी करण्यात आली. मला माहिती ही १० लक्षची होती २.१० कोटीची नव्हती. यामधे जे झाले आहे ते क्लरीकल कॅल्क्यूलेशन मधे चूक झालेली दिसते. मी जो पाठविलेला होता, तो १० लाखाचा होता.

श्री.संजय सिरसाट :आयुक्तीनी किती रक्कम मंजूर केली यासी घेणे देणे नाही. परंतू प्रस्ताव सादर करतांना याची पूर्ण कल्पना आयुक्तांना होती का हा माझा प्रश्न आहे.

मा.आयुक्त :ज्यांचेखाली माझी सही आहे त्याची मला कल्पना होती. माझ्याकडे जितकी माहिती आली त्याची कल्पना होती.

श्री.संजय जोशी : या प्रस्तावात दिनांक १.१२.२००५ ला खरेदीची नोटीस दिलेली आहे. परंतू या पूर्वी एमआरटीपी ॲक्ट च्या कलम ४९ प्रमाणे जमीन मालकाने महाराष्ट्र शासनाला जी खरेदीची नोटीस दिली होती ती खरेदीची नोटीस रद्य झाल्याचे महाराष्ट्र शासनाचे अव्वर सचिवांचे पत्र माझ्याकडे आहे. या पत्राची प्रत या सचिकेला आहे का? या पत्रास शेवटी असे दिले की दिनांक २८.७.२००५ रोजीच्या पत्रान्वये बजावलेली खरेदी सूचना फेटाळण्यात येत आहे असे आपणांस कळविण्याचे मला निर्देश आहे. खाली नंदकिशोर पाटील,अव्वर सचिव यांचे पत्र माझेकडे आहे. या पत्राची प्रत संचिकेत सूध्दा नाही तसेच ठरावात सूध्दा उल्लेख नाही. १.१२.२००५ ची खरेदी सूचनेची तारीख यात दिली आहे परंतू जमीन मालकाने या नंतर दिनांक ३०.१२.२००५ रोजी महापालिकेला, विभागीय आयुक्त, उपसंचालक नगररचना, तसेच सहा. संचालक नगररचना यांना पत्र दिले, त्याची पोच पावती माझेकडे आहे. ही जी खरेदीची नोंटीस आहे ती मी दिलेली नाही. व संबंधीत जमीन मालकाने २०/-रूपयाच्या बॉण्डवर प्रधान सचिवांना ॲफिडेव्हिट करून दिलेले आहे. त्यामूळे या जमिनीचा खरेदी व्यवहार करू नये. ते पत्र सुध्दा माझ्याकडे आहे. असे असतांना हा प्रस्ताव १.१२.२००५ च्या खरेदी सूचनेनूसार २.१० कोटीचा प्रस्ताव त्या मालकाची मागणी नसतांना या सभागृहाकडून मंजूर करून घेण्यात प्रयत्न केला जात आहे. स.सदस्यांनी अनावधानाने एखादा ठराव ठेवला तर त्यांची सगळीकडे वाच्छता होते. परंतू प्रशासनाकडून असा गंभीर स्वरूपाचा ठराव आलेला आहे, यात माझे काही चूकले असेल तर तसा खुलासा प्रशासनाने करावा. या संबधीची सर्व माझ्याकडील सत्यप्रती मा.महापौर यांना सुपूर्द करीत आहे. याची सखोल चौकशी करावी.

(बरेच सदस्य एकाचवेळी बोलतात.)

श्री.मुजीब खान :एक वर्षात कितीतरी प्रस्ताव सहा.संचालक नगर रचना यांचे मार्फत मंजूरीसाठी आलेले आहे. यापूर्वीही गारखेडा प्रकरणात मा. आयुक्त यांनी खुलासा केला होता की माझ्यासमोर प्रकरण आलेले नाही. वारंवार संबधीत अधिकारी असे प्रस्ताव सभागृहासमोर सादर करून दिशाभूल करीत असून सहा.संचालक, नगर रचना अधिकारीच एकटे यास दोषी आहे असे माझे मत आहे. यापूर्वीही स्थायी समिती सभेत अनेकवेळा असे झालेले आहे. त्यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय आज घेण्यात यावा. डुप्लीकेट काम करण्यात एक्स्पर्ट आहे. यापूर्वीही गारखेडा प्रकरणात मूळ मालकाने दाखल केले नाही. दूसऱ्यांनी दाखल केलेले आहे. ते ही

समोर आलेले आहे. याचेही सर्व शहरात चर्चा झाली. आज दूसरा प्रश्न स.सदस्यांनी मांडला एक एक कागदपत्रे समोर आले. असे अधिकारी महानगरपालिकेत नको. याचा निर्णय आज व्हावा. हे अधिकारी क्र.१ चे खोटे आहे. महापालिकेची दिशाभूल करतात, खूलासा करण्यासाठी त्यांचेकडे काही नाही.

श्री.संजय सिरसाट : गेल्या १५ दिवसात महानगरपालिकेत होत असलेल्या भ्रष्टाचारा संबधी फोटोसह काही बातम्या आलेल्या आहेत. आजी माजी नगरसेवक व पदाधिकारी यांचेवर पोलीसात गुन्हे नोंद करण्यात आले. शहर सूधार समितीकडे प्रस्ताव सादर केला तेंव्हा त्यात १० लक्षच चूकून रक्कम नमूद होते. त्यानूसार एरीयात सूध्दा दूरूस्ती केलेली आहे व क्षेत्र वाढवून घेतले आहे. त्याची किमत आता २.१० कोटी झालेली आहे. परंतू जेंव्हा प्रस्ताव प्रशासनामार्फत सभागृहासमोर येतो तो अत्यंत बारीक छाननी करून आलेला असेल असे नगरसेवकांना वाटते. चूक नगरसेवकांचीच नाही तर प्रशासनाची सूध्दा चूक होते हे प्रशासनाने सिध्द करून दाखवलेले आहे. सभा चालू होण्यापूर्वी मी,आयुक्तांना एक प्रश्न विचारला होता की, जेंव्हा प्रस्ताव तुमच्याकडे आला, तेंव्हा त्या प्रस्तावाची पूर्णपणे तुम्हाला कल्पना आहे का? मा.आयुक्तांना वाटले असेल,पैशाचे काहीतरी घोळ असेल, म्हणून खूलासा केला असेल की, १० लाखावर सही केली होती. २.१० कोटीवर नव्हती. मुळात प्रकरण वेगळे आहे. पैसे किती जात आहे याला महत्व नाही पण चोरी कोण करीत आहे याला महत्व आहे. एक राठोड साहेब असू शकत नाही. स.सदस्य श्री.संजय जोशी यांना मूळ मालकाने हे कागदपत्रे दिले आहे. ४९ ची नोटीस दिली ती शासनाने अमान्य केलेली आहे. त्याची कागदपत्रे माझ्याकडे आहे. कोणीतरी बनावट सह्या करून महापालिकेस कूणीतरी बुडवतो. जिल्हाधिकारी यांना पत्र दिले.त्याच्याप्रती सर्वांना दिल्या.सहा.संचालक नगररचना आयुक्तांना प्रती दिल्या आहे. मी खरेदी सूचना दिलेली नाही कृपया माझ्याशी पत्रव्यवहार करू नये, करायचा असेल तर श्री.भालचंद्र लक्ष्मण गोटे रा.देवगावं रगांरी ता.कन्नड जि.औरंगाबाद दुरध्वनी कोडनबंर सहीत दिलेले आहे. त्याचा फोन नं.२४७७०६ कोड नं.०२४३५ आहे. चोरी करायचीच असेल तर मुळ मालकाशी काही घेणे देणे नाही. पैसे खायचेच असेल तर ते खाता येतं हे प्रशासनाने सिध्द करून दाखवले आहे. संबधीत मूळ मालक यांनी मला माझ्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा दुसऱ्या पत्यावर करू नये परंतू त्यांनी दुसरा पत्ता असा टाकला की, श्री.भालचंद्र एल. गोटे द्वारा हाऊस ऑफ डोअर सेन्ट्रल पॉईन्ट जालना रोड औरंगाबाद. जो मूळ मालक तुम्हाला पत्र देतो, माझ्या पत्त्यावर संपर्क करावा. फोन नंबर देतो, परंतू यांचे पत्र जातात, सेंट्रल पॉईन्ट जालना रोड, औरंगाबाद. या नांवावर एक नाही,दोन पत्र जातात. सहा.संचालक,नगर रचना ऐकत नाही. प्रशासन ऐकणार नाही. पैशाचा घोळ होणार आहे. म्हणून संबधीत मालकाने वैतागून बेगमपूरा पोलीस स्टेशन मधे तक्रार केली की माझ्या नावाखाली कुणी तरी गैरवापर करीत आहे. माझ्या सहया करीत आहे. मूळ मालक वैतागतो. त्यांनी आणखी काय करायला पाहीजे. संबधीताचे १० पत्र आलेले आहे त्यावरील सहया व प्रशासनाकडे दाखल झालेले पत्र यावरील सही यात तफावत आहे. त्यांनी त्याचे निवडणूक कार्ड जोडलेले आहे. सर्व माहिती दिलेली आहे. माझा प्रश्न आहे, मा.आयुक्तांनी ही चूक जाणूनबूजून केलेली असून नगरसेवक एखादया प्रस्तावाचे सुचक अनुमोदक झाले तर त्यांचेवर पोलीसात गुन्हा नोंद होते. हा प्रस्ताव

मा.आयुक्तांनी सादर केलेला असेल तर मा.आयुक्तांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. एक नगरसेवकाने काही थोडी शिवीगाळ केली तर अधिकारी असे अविर्भावाने पोलीस स्टेशनला जातात, जसे काही जग जिंकून आलो. जावून नगरसेवकांची तक्रार करतो. यांची तक्रार कूणी करावी. आज स्थितीला मला पोलीस स्टेशनमध्ये जावून हजेरी लावावी लागते, केंवळ एका प्रस्तावात मी सुचक अनुमोदक होतो म्हणून. आज हा प्रस्ताव मंजूर केला असता व संबधीत मालक यांनी शासनाकडे तक्रार केली असती तर शासनाने आदेश केले असते की सर्वसाधारण सभेवर गुन्हा दाखल करावा यास जबाबदार कोण आहे. एक तर हे प्रकरण सीआयडी कडे चौकशी साठी देण्यात यावे नसता जे कुणी जबाबदार असेल त्याचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

(अनेक सदस्य एकाचवेळी बोलतात.)

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांना खुलासा करायचा असेल तर सभागृहाने ऐकून घ्यावे.

सहा. संचालक(न.र) : स.सदस्यांनी जे काही बोलले आहे ते सर्वच कागदपत्र संचिकेमध्ये आहे. श्री.भालचंद्र गोटे यांना मी स्वत: सांगितले होते की पोलीसात अर्ज करा म्हणून. यात शितलचंद डहाळे नावाचे व्यक्ती आहे, त्यानी नोटीस दिलेली असून त्यांनी आपण सर्वांना परेशान केलेले आहे. ४९ ची जी नोटीस दिली होती ती शासनास आम्ही फेटाळावयास लावली. १२७ नोटीस त्यांनी त्यांचे नावावरही तसेच भालचंद्र गोटेचे नावाने पण दिलेली आहे. १२७ ची नोटीस दिल्यानंतर कायदयानूसार त्यास ६ महिन्याची मुदत दिलेली असते त्यांचे कागदपत्र तपासणी करण्यास ही वेळ नसतो. सहा महिण्यात जर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेला नाही तर तो रस्ता डिलीट होतो. या भिती पोटी आणि नंतर आमच्यावर कार्यवाही होते. ४९ च्या नोटीसचा विषय संपलेला होता. १२७ ची नोटीस दिलेली होती. १६०० रनींग मिटरमधे एक नाही तर १०० ही मालक असू शकतात. एका मालकाची नोटीस असली तरी जो रस्ता करावयाचा आहे तो रस्ता होण्याचे हेतू सफल झाले पाहिजे. म्हणून जेवढी लांबी आहे दोन जंक्शन मधली तेंवढ्या लांबीच्या रस्त्याच्या जागेचे भुसंपादनाची कार्यवाही करावी लागते.

श्री.संजय सिरसाट : अत्यंत खोटारडी माहिती सभागृहात देण्यांत येते. आताच संबधीत अधिकारी यांनी म्हटले की, डहाळे व्यक्ती चालू आहे. डहाळे नावाच्या व्यक्तीचा या रस्त्याला लगत असलेला लेआऊटची वाच्चता केली नाही परंतू मीच त्या व्यक्तीला सांगितले की ४९ ची नोटीस द्या, ती रद्य मी करून आणावयास लावली १२७ ची नोटीस बोगस आहे मी त्या व्यक्तीला पोलीस स्टेशनमधे जावून सांगायला लावले, याची कल्पना आयुक्ताना आहे काय?

श्री.प्रशांत देसरडा : मा.आयुक्तांना हे माहित आहे का?

मा.आयुक्त : मी एक परिपत्रक बघीतले आहे शासनाचे सहा. संचालक यांचेकडून आलेले आहे की १२७ ची कार्यवाही करावी लागेल, मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावे लागेल. वैधानिक कार्यवाही करावी लागेल. त्यापूर्वी इतके बघावे की, ले-आऊट मधून तुम्ही काही भाग घेतलेला आहे का. १२७ ची कार्यवाही म्हणजे काय आपण कलेक्टरला सांगतो की रस्ता आहे तो विकत दयावा. मालक कोण आहे ते संबधीत विभाग बघतात त्या जागेचा मोबदला जिल्हाधिकारी यांचेकडे भरणा करावा लागतो. १२७ नुसार कार्यवाही झाली तर सहा महिण्याच्या आत सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविल्या

जातो. दोन वेळा अधिसूचना निघते. देतांना कुणाला दयायचे, किती रक्कम दयायची हे जिल्हाधिकारी ठरवितात.

श्री. संजय जोशी : या प्रस्तावात ४९ च्या नोटीसचा कूठेही उल्लेखच नाही. ४९ ची नोटीस दिली होती. प्रयत्न करून रद्द केली. पण यात उल्लेख नको का?

श्री.प्रशांत देसरडा : मा.आयुक्तांनी किती रकमेवर सही केली.

श्री.संजय सिरसाट : हा रस्ता डेड एन्ड व पूढे जो जातो, तो नो डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये आहे.

सहा.संचालक नगररचना:हा २४ मीटरचा रस्ता आहे तो लेणीकडे जाणाऱ्या रस्त्यापासून पूढे ४५ मीटर रस्त्याला पूर्वेकडे जावून दक्षिणेकडे मिळतो. नो डेव्हलपमेंन्ट झोन मधून जातो परंतू डी.पी रस्ताच आहे.

श्री.संजय जोशी : नो डेव्हलपमेंन्ट झोन मधे बांधकाम परवानगी देत नाही. आणि २४ मीटर रस्त्याच्या बाजूला वस्ती नसतांना कसा घेतो. खरेदी करणार कसे.

मा.आयुक्त : पर्चेस करण्याची महानगरपालिकेची चॉईस नाही त्यांनी १२७ ची नोटीस दिलेली आहे.

श्री.संजय जोशी : महापालिका म्हणू शकते की नो डेव्हलपमेंन्ट झोन मधील रस्ता आहे. घेवू शकत नाही.

मा.आयुक्त : आपल्याला मना करण्याचा अधिकार आहे का?

सहा.संचालक न.र. : आपणांस मना करण्याचा अधिकार नाही. आपल्याला चॉईस नाही. आपणांस सहा महिण्याच्या आत प्रस्ताव सादर करावा लागेल.

श्री.संजय सिरसाट : चुकीचा ठराव आणलेला आहे. संबधीत मालकास माहित न करतांच बोगस ठराव आणला हा अक्षेप आहे.

सहा.संचालक, न.र. : प्रस्ताव बरोबर असून कूठलाही दोष नाही. १२७ च्या नोटीसच्या संबधाने हा प्रस्ताव आहे. ४९ च्या नोटीसच्या संबधाने नाही.

श्री.संजय जोशी : १२७ च्या नोटीसनूसार जर प्रस्ताव असेल तर जे मालक आहेत, श्री.गोटे यांनी ३१.१२.२००५ पत्र दिलेले आहे की, मी १२७ ची नोटीस दिलेली नाही, त्यांचे नांव कसे आले.

मा.आयुक्त : संबधीत अधिकारी यांनी असा खूलासा करावा की एक रस्त्यामधे जर १०० मिळकती बाधीत होत असतील व एका ही व्यक्तीने मागणी केलेली असेल तर पूर्णचा पूर्ण रस्ता करतांना,ज्यांनी नोटीस दिली त्याची जागा विकत घ्यावी लागणार.

मा.महापौर : श्री.गोटे यांनी पत्र देवून कळविले की १२७ ची नोटीस मी दिलेली नाही तरी प्रस्तावात नाव कसे नमूद केले, याचा खूलासा करावा.

सहा.संचालक, न.र. : १२७ ची नोटीस एक व्यक्तीने दिली तरी प्रस्ताव आणावा लागतो.

श्री. संजय जोशी : यात १०० मिळकत धारक असतील तर त्याचे नाव आले नाही. यांना डहाळेकडून पैसे मिळाले म्हणून गोटेचे नांव आले.

मा. महापौर :एकूण जागा जी घेणार आहोत त्यात दोन मालक आहे का ?

सहा. संचालक नगररचना:दोनच नाही.गोटेचे नावाने एक नोटीस आहे परंतू कागदपत्र व्हेरीफाय करणे ची जबाबदारी आमची नाही आमच्याकडे जे आलेले आहे त्यानूसार आम्ही प्रस्ताव देत आहोत.

श्री. संजय जोशी : दिनांक ३१.१२.२००५ रोजी गोटेने पत्र दिले की मी १२७ ची नोटीस दिलेली नाही. तरी प्रस्तावात त्याचे नाव येते. सहा. संचालक नगररचना हे मोठयाने सांगतात की आम्ही कागदपत्र तपासणी करीत नाही. असे असेल तर प्रस्ताव कोण तयार करतात.

श्री. संजय सिरसाट : यात दुसरे असे की अध्यक्ष जिल्हा परीषद शिक्षक गृह निर्माण संस्था यांचे पण नाव नमूद आहे. सहा. संचालक नगररचना यांनी एखादे पत्र ज्या अध्यक्षांना पाठवले आहे त्याची पोच पावती आलेली आहे असे काही झालेले आहे काय

मा. आयुक्त : खरेदी सूचना कूणाकूणाकडून मिळालेली आहे त्याचा खूलासा संबधीत अधिकारी यानी करावा.

सहा. संचालक न.र. : शितलचंद डहाळे व गोटे याचेकडून नोटीस आलेली आहे.

श्री. संजय जोशी :१.१२.२००५ रोजी श्री. डहाळे यांनी नोटीस दिली असे सहा. संचालक नगररचना याचे म्हणणे आहे. ३१.१२.२००५ रोजी गोटेचे पत्र आहे की मी नोटीस दिली नाही.

मा. आयुक्त :प्रस्तावामध्ये श्री.गोटे, शितलचंद डहाळे तसेच हिमायनगर येथील मिळकत धारक सेक्रेटरी स्वयम सिध्द गृह निर्माण संस्था,आणि अध्यक्ष जिल्हा परीषद गृह निर्माण संस्था असे चार लोक झालेले आहे. यात मिळकत धारक हे १०० असतील परंतू जर चार पैकी एक व्यक्तीने लिहून दिले की मी खरेदी सूचनेची नोटीस दिलेली नाही. तसे यायला पाहिजे. कमीत कमी जो निर्णय घेत आहे त्या कमेटीला कळायला पाहिजे की असे झालेले आहे. चूक आहे.

श्री. संजय जोशी :१२७ ची नोटीस दिलेली नाही, हे पत्र दिलेले असताना गोटेचे नाव कसे आलेले आहे. ही एक चूक हीएक चूक असे म्हणता म्हणता सगळयाच चूका असे होईल.

सहा. संचालक न.र. :यात गोटेची फेर नोटीस असली तरी कागदपत्र तपासून निर्णय घेण्याचे काम एसएलओचे असते.

श्री.प्रशांत देसरडा : हे काय म्हणतात, कळत नाही.

मा.महापौर :१२७ ची नोटीस गोटेची आलेली आहे का त्यानी पत्र दिले की नोटीस पाठविली नाही. तुम्ही आताच खुलासा केला की ती नोटीस चूकीची आलेली आहे. तो व्यक्ती माझ्याकडे आला होता. त्या व्यक्तीला मी पोलीस स्टेशनला पाठविले तुम्हीच बोलताना खुलासा केला,याचा अर्थ त्याची नोटीस नव्हती, दूसऱ्या कूणी तरी माणसाने दिलेली आहे. त्यांचे नांव ठरावात कसे आले.

सहा. संचालक न.र. :१२७ ची नोटीस आहे उदया जर क्लेम केला की,मी पण १२७ ची नोटीस दिलेली होती. लॅप्स् झालेली आहे ती जबाबदारी आमच्यावर येईल.

श्री. संजय जोशी :सभागृहाची सरळ सरळ दिशाभूल केलेली आहे.

सौ.लता दलाल : सभागृहाची दिशाभूल करतात.

श्री. प्रशांत देसरडा : पून्हा एकदा नगरसेवकांना हातकडया लागण्यापासून या दोन सदस्य श्री.संजय जोशी व संजय सिरसाट यांनी आम्हाला वाचवले त्याबध्दल सर्वाच्या वतीने त्याचे अभिनंदन करतो. हा ठराव पास झाला असता सर्व सदस्यांना तसेच प्रशासनावर म्हणजे मा. आयुक्त यांचेवर ही गुन्हा दाखल झाला असता. संबधीत अधिकारी अशा पध्दतीने खुलासा करीत आहे की कुठेतरी शाळा चालू आहे मी मुख्याध्यापक आहे. हा प्रस्ताव शासनाकडून आलेला आहे त्यामूळे शासनाने सूध्दा विना चौकशी करता खरेदी सूचना आपल्याकडे पाठविली शासनाला आपण पत्र देवून कळवावे की ही खरेदी सूचना कशाच्या अधारे पाठवली आम्ही शासनावर भरवसा करून प्रशासनावर विश्वास करून मंजूर करतो संचिकेवर मी बघीतले मा. आयुक्तांची फक्त १० लक्षच्या खर्चाची मान्यता आहे. हा प्रकार का घडत आहे. गारखेडा प्रकरणा संबधीत अधिकारी यांनी खाडाखोड केली त्यांच्या आरोप पत्रामध्ये त्या माणसावर अद्याप आरोप पत्रात दखल नाही. त्या व्यक्तीवर अजून सूध्दा कार्यवाही नाही. ज्यांनी सर्वे नबंर मधे खाडाखोड केली ते अधिकारी अजूनही

खूर्चीवर बसून डरकाळ्या फोडतो. आरोपपत्रात त्याचे कुठेही नांव नाही. म्हणून असे अधिकारी सभागृहाची तसेच मा.आयुक्तांची दिशाभूल करतात. त्यामूळे या ठरावास माझा विरोध आहे. अशा अधिकाऱ्याच्या काळात किती भूसंपादनाचे प्रस्ताव झालेले आहे, जितके ठराव झालेले आहेत, सर्वांची चौकशी करावी. पुन्हा सी.बी.आय.लागेल.

मा. आयुक्त :शासनाचे जे औरंगाबाद विभागाचे सहा.संचालक नगररचना आहेत त्यांनी एक पत्र पाठविले होते की, त्यात त्यांनी असे लिहिले होते की सेक्रेटरी स्वयम सिध्द हौसींग सोसायटी सर्वे नं.९८ पहाडसिंगपूरा यांनी १.८.२००५ च्या पत्रान्वये विषयांकित रस्त्या बाबत औरंगाबाद महापालिकेला उक्त अधिनियमाच्या कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. अधिनियमातील उक्त तरतूद विचारात घेता संदर्भीय नोटीस आपल्या कार्यालयास प्राप्त झाल्यापासून ६ महीण्याच्या विहीत कालावधीच्या आत संबधीत जागेसाठी भूसंपादनाचा प्रस्ताव दाखल करणे आवशक आहे. या प्रकरणातील कालमर्यादा विचारात घेता विहित मूदतीत कार्यवाही होणे गरजेचे आहे. आपण असे करून जर कुणी कुणाच्या मालकाच्या नावावर चूकीने नोटीस पाठविली असेल आणि त्या व्यक्तीने सांगून तो व्यक्ती बाजूला झाला बाकीच्या लोकांनी नोटीस दिलेली आहे जे चार लोकांचे नाव आलेले आहे त्यांना विचारावयास पाहिजे जर दिली नसेल तर रद्य करू या पैकी एकानी दिली असेल व रस्ता डिलीट होवू नये म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्याची गरज भासेल. ४ लोकांचे नांव आहे. श्री.गोटेचे क्लीअर झाले. बाकी तीन लोकांचे.

श्री. प्रशांत देसरडा : आपण फार सहजतेने घेतात. आपणांस फसवणूक करीत आहे.

श्री. संजय जोशी : कार्यवाही काय करणार आहे एवढाच खूलासा करावा. संबधीत श्री.गोटे यांनी नोटीस दिलेली नसतांना प्रस्तावात त्याचे नाव कसे आले.

मा. आयुक्त :संबधीत श्री. गोटे यांचे नाव आले या बाबतीत सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे.

डॉ. भागवत कराड :स.सदस्य श्री.संजय जोशी व संजय सिरसाट यांचे सभागृहात अभिनंदन करण्यात आले, पून्हा त्यांचे माझ्यावतीने अभिनंदन करतो. हा प्रस्ताव मंजूर केला असता तर अनेक स.सदस्यांवर प्रशासनाने गुन्हे दाखल केले असते. तसेच महापालिकेचे २.१० कोटी गेले असते. यात सहा.संचालक श्री.राठोड त्यांचे कर्मचारी दोषी आहे असे वाटते. संबधीतावर काय कार्यवाही करणार आहे हे आताच जाहीर करावे. सहा. संचालक नगररचना हे शासनाचे अधिकारी असतील तरी मा. आयुक्तांना शासनाकडे रिपोर्ट पाठविण्याचा अधिकार आहे. तसा रिपोर्ट आयुक्तांनी पाठवावा कार्यवाही करावी. व जे कर्मचारी वर्ग या विभागात काम करतो उपअभियंता असेल किंवा इतर जे कोणी या विभागातील संबधीत असेल त्याचेवर कार्यवाही आजच जाहीर करावी . तसेच हा प्रस्ताव चूकीचा आणलेला आहे मा. आयुक्तांनी तपासणी करून परत आणण्याचे आदेश करावेत. जो रस्ता त्या भागातून जात आहे तो डिलीट होवू नये आज ना उदया कोणी तरी नागरीक राहतील.

श्री.संजय शिरसाट : सहा.संचालक,नगर रचना यांनी हा प्रस्ताव आयुक्तांच्या मान्यतेनंतर सर्वसाधारण सभेत आणला आहे.

सहा.संचालक,न.र. : मला खूलासा करायचा आहे.

श्री. देसरडा प्रशांत :जो गारखेडा प्रकरणाच्या बाबतीत शासनाकडे फॅक्स केला तो सापडत नाही. त्यामूळे आता फॅक्स वगैरे पाठवू नये योग्य ती कार्यवाही करावी. फॅक्स पाठवू नका.

श्री. अ. रशीद खान :शहर सूधार समितीच्या मार्फत हा प्रस्ताव आलेला आहे. जेंव्हा सभागृहात विचारणा केली असता अभ्यासपूर्वक मांडलेला आहे असे सांगण्यात आले. १० लक्ष ऐवजी २.१० कोटी करण्यात आले. जी रक्कम वाढविली त्या रक्कमेस मा. आयुक्तांनी मान्यता घेतलेली आहे का? १० लक्षच्या रक्कमेची मान्यता घेतली असेल तर २.१० कोटीचा प्रस्ताव कशाच्या अधारे मांडलेला आहे. आपणास अंधारात ठेवले. आपली सही घेतली नाही.

श्री.शंशाक विसपूते :संबधीत अधिकारी खोटे वागतात. त्यांची वर्तणूक इतकी चूकीची आहे. मा. आयुक्तांना मी बोललो होतो की यांचेवर विश्वास ठेवू नका हे इतके सराईत खोटे बोलतात, चेहऱ्याचे हावभाव अशा पध्दतीने आणतात. तुम्हाला मी सांगतो गारखेडा प्रकरणात जेंव्हा संबधीत अधिकारी सदर ठिकाणी आले त्यांना रस्ता दाखविता आला नाही. पन्नालालनगरचा असेल, अंगुरीबागचा असेल,अनेक प्रकरणात घोटाळे आहे. या सर्व प्रकरणात संबधीत अधिकारी व त्यांचे कडील काही कर्मचारी टीममधे समाविष्ट आहे . आंबेडकरनगर भागात स्मशान भूमीसाठी जागा भूसंपादीत केलेली आहे ती करण्याची गरज नव्हती. म्हणजेच राखीव नसलेल्या भूखंडाचे पण संबधीत अधिकारी यांनी भूसंपादन करावयास लावलेले आहे. तो भूखंड एम.आय.डी.सी.मध्ये येतो. अशा अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करावी.

श्री. सलीम पटेल :संबधीत अधिकारी यांचेकडून सदर संचिका घ्यावी व ती मा. आयुक्तांकडे दयावी व संबधीत अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे . व सदर प्रकरणाची चौकशी करावी. व त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. संबधीत अधिकारी यांचेवर गुन्हा दाखल करण्यात यावा.

श्री. प्रशांत देसरडा :मा. पोलीस आयुक्त यांचेकडे आजच्या आज संबधीत अधिकारी यांचेवर गुन्हा दाखल करावा. त्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे.

सहा. संचालक न.र. : मी कुठलीही दिशाभूल केलेली नाही १२७ च्या नोटीस नूसार विषय आहे. (मोठया आवाजात बोलतात.)

श्री. वसंत नरवडे :मा.महापौर यांचे परवानगी शिवाय अधिकारी यांनी मंचावर येवून बोलायचे नाही. हे सभागृह आहे. याची जाणीव ठेवावी.

श्री.मुजीब खान :सभागृहाची दिशाभूल करता चुकीचे प्रस्ताव सादर करता व पून्हा संबधीत अधिकारी सांगता मी दिशाभूल केलेली नाही.

(याच वेळी स.सदस्य श्री.मुजीब खान हे पोडीयमला लाथ मारतात व त्यावेळी सुरक्षा रक्षक हे पोडीयमला पकडतात. तसेच स. सदस्य मा. महापौर यांचे डायससमोर उभे राहून संबधीत अधिकारी यांचेवर गुन्हे दाखल करावे म्हणून मागणी करतात. अनेक सदस्य व्यासपीठाजवळ येतात, बरेच सदस्य एकाचवेळी बोलतात व आपसात बोलतात. मा.महापौर श्री.राठोड, सहा.संचालक नगर रचना यांना त्यांचे व मा.आयुक्तांचे आसनाजवळ बोलावतात व तेथे त्यांना थांबवून घेतात.)

मा.महापौर : सर्व स.सदस्यांना विनंती,आपल्या जागेवर बसावे.

मा.उपमहापौर :संबधीत अधिकारी यांनी दिशाभूलच केलेली नसून सभागृहात गैरवर्तन केलेले आहे. सभागृहाचा अवमान केलेला आहे सर्व सदस्यांचा मान राखून त्यांचेवर पोलीस गुन्हा दाखल करावा.

श्री.संजय सिरसाट :या सभागृहात महापालिका प्रशासनाने केलेल्या भूखंड घोटाळा प्रकरणी अत्यंत जोरदार चर्चा चालू होती. सर्वाच्या भावना तिव्र झाल्या होत्या मा.आयुक्तांनी त्यांचे पध्दतीने खुलासा करण्याचा प्रयत्न केला सहा. संचालक नगररचना जेंव्हा खुलासा करीत होते हे समोर बसलेले सदस्य आहे हे माझे काहीही बिघडू शकत नाही हे

त्यांना माहित होते. म्हणून संबधीत अधिकारी हे अरेरावीची भाषा वापरीत होते. संबधीत अधिकारी यांना एका स. सदस्यांनी मागिल बैठकीत नोटाचा हार घातला त्यावेळी सर्व अधिकारी बाहेर गेले होते. आम्ही नगरसेवकांनी निषेध केला व स. सदस्य यांना ताकीद दिली की यापूढे असे काही करू नये. संबधीत अधिकारी यांना असे वाटते की माझी पूढील महिण्यात बदलीच होणार आहे. माझ्यावर करून काय कार्यवाही करणार आहे. आयुक्त दोन ओळीचे पत्र लिहीतील की योग्य ती कार्यवाही करावी.जे स्टेटमेंट संबधीत अधिकारी यांनी केलेले आहे ते लहान मुलगा सूध्दा सांगू शकेल. त्यांनी असे म्हटले की मी त्या व्यक्तीला सांगितले की ४९ ची खरेदी सूचना दे मी त्या व्यक्तीला सांगितले की त्या व्यक्तीच्या विरूध्द तक्रार करा परंतू हे सर्व घटना क्रम मा. आयुक्तांना माहित नाही असा माझा समज आहे. माहित नसेल तर आयुक्त सूध्दा यामधे दोषी ठरवतील.डहाळे नावाचे जे व्यक्ती आहे तो संस्थेच्या लोकांना भेटत नाही. संस्थेला जो पत्र व्यवहार केलेला असेल आवक जावक पत्रावर एका नेही पोच पावती म्हणून सही नाही. तीन लोकाकडे कोणतेही कागदपत्र नाही.फक्त डहाळे नावाचे व्यक्तीने व सहा. संचालक नगररचना व इतरांनी मिळून हा भ्रष्ट्राचार केलेला आहे.्र.उदया काय होणार आहे हे मला माहित आहे मा. आयुक्त म्हणतील मी जे दोन तीन लोक आहे. त्यांचे बाबतीत चौकशी करतो उपआयुक्त यांना चौकशी साठी नेमतो त्याचा अहवाल घेतो नंतर गुन्हा नोंद करतो. मा. महापौरांच्या सोबत सर्व सदस्य आहेत. मा. आयुक्त यांना आदेशीत करावे की आजच्या आज पोलीसात गुन्हा नोंद करावा. जे कोणी दोषी ठरतील, त्यांचेवर कार्यवाही होईल. गुन्हा नोंद झालाच पाहिजे ही सर्व सदस्यांची मागणी आहे.

श्री. सलीम पटेल :संबधीत सहा. संचालक नगररचना अधिकारी यांचे कार्यकाळात किती ठिकाणेच भूसंपादनाची कार्यवाही झाली त्याची सूध्दा चौकशीचे आदेश करावेत.

श्री. संजय सिरसाट :ठराव मंजूर केला असता तर उदयाच सर्व सदस्यावर पोलीस कार्यवाही झाली असती म्हणून आजच्या आज संबधीत अधिकारी यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल करावा. संबधीत अधिकारी यांनी दिर्घ मुदतीची रजा दिली तर बदलीच्या ठिकाणी नंतर ते रूजू होतील. त्यांचेवर पोलीसात गुन्हा नोंद होणार नाही त्यासाठी आजच्या आज गुन्हा दाखल करावा.

श्री.संजय जोशी : ठरावात श्री.गोटे नांव यायला नको होते. त्या व्यक्तीचे पत्र आहे, ॲफिडेव्हीट करून दिले, असे असतांना संबंधीताला २.१० कोटी रक्कम देण्याची गरज काय. गुन्हा दाखल करावा.

(याच वेळी सर्व स. सदस्य संसबधीत अधिकारी यांचेवर गुन्हा नोदविण्याची डायस समोर जावून मागणी करतात. मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.संजय सिरसाट :पिठासीन अधिकारी म्हणून मा. महापौर आहेत. चुकीचा प्रस्ताव त्यांच्यासमोर आला म्हणून मा. महापौर आपण सुध्दा पोलीसात गुन्हा नोंद करू शकतात.

मा.महापौर : विषय क्र.३ वर फारच चर्चा झालेली असून सभागृहाचे मत लक्षात घेता सहा.संचालक,नगर रचना श्री.राठोड यांनी शहर सुधार समितीचा तसेच या सभागृहाची व मा.आयुक्तांची सुध्दा दिशाभूल केलेली आहे. श्री.भालचंद्र एल.गोटे यांनी १२७ ची नोटीस दिलेली नसतांना हे संबंधीत अधिकारी यांना माहित असतांना त्यांनी या सभागृहाचे व मा.आयुक्तांचे तसेच शहर सुधार समितीची दिशाभूल केलेली आहे. म्हणुन त्यांचे विरूध्द गुन्हा नोंदविण्यात यावा. तसेच या प्रस्तावाच्या अनुषंगाने इतर भूसंपादन मोबदल्या संबंधी अनेक घोटाळे झालेले

आहेत. तरी महापालिकेचे हित लक्षात घेता त्यांना महापालिकेच्या सेवेतून कार्यमूक्त करण्यात यावे व शासनाकडून त्यांचे सर्व कामाची चौकशी करावी असे प्रशासनास आदेश देण्यांत येत आहे. संबंधीत अधिकारी यांना आजपासूनच कार्यमूक्त करण्यात यावे. हा विषय प्रशासनाकडे परत पाठविण्यात येत आहे व या संबंधी प्रशासनाने सविस्तर चौकशी करावी व योग्य वाटेल तर पून्हा या सभागृहासमोर ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सहा.संचालक, नगर रचना श्री.एम.डी.राठोड यांनी शहर सुधार समितीची तसेच या सभागृहाची व मा.आयुक्तांची दिशाभूल केलेली आहे. श्री.भालचंद्र एल.गोटे यांनी १२७ ची नोटीस दिलेली नसतांना हे संबंधीत अधिकारी यांना माहित असतांना त्यांनी या सभागृहाचे व मा.आयुक्तांचे तसेच शहर सुधार समितीची दिशाभूल केलेली असल्यामूळे त्यांचे विरूध्द गुन्हा नोंदविण्यास तसेच भूसंपादन मोबदल्या संबंधी अनेक घोटाळे झालेले असल्यामूळे, महापालिकेचे हित लक्षात घेता, त्यांना महापालिकेच्या सेवेतून आजपासूनच कार्यमूक्त करण्यात यावे व शासनाकडून त्यांचे सर्व कामाची चौकशी करण्यासही मंजूरी देण्यांत येते. त्याचप्रमाणे, सदरील विषय प्रशासनाकडे परत पाठविण्यात येत आहे व या संबंधी प्रशासनाने सविस्तर चौकशी करावी व योग्य वाटेल तर पून्हा या सभागृहासमोर ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१/४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, महानगरपालिका हद्दीत गुंठेवारी विकास अधिनियम-२००१ अंमजबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी अर्जदारांनी महानगरपालिकेत गुंठेवारी कायद्यान्वये आपली मिळकत निमानूकुल करणे सोईचे व्हावे, यासाठी अर्जदारांना गुंठेवारी कायद्याची माहिती देवून त्यांचे गुंठेवारी अंतर्गत मिळकत नियमानूकुल करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करून महानगरपालिकेत सादर करणेसाठी दिनांक २४.०८.२००५ रोजीच्या मा.स्थायी समितीच्या सभेतील विषय क्रमांक ४७ दि.२४.८.२००५ च्या ठरावानूसार सात एजन्सीची नियूक्ती करण्यात आली आहे.

सदर एजन्सी मार्फत Total Station Survey करून त्यानंतर प्रत्येक मिळकत धारकांना गुंठेवारी अंतर्गत प्रस्ताव संबंधित एजन्सी मार्फत दाखल करण्यासाठी सूचना देण्यात आली आहे. मुदत पूर्ण होवूनही अपेक्षित तसा प्रतिसाद मिळत नाही.

करीता ज्या मिळकत धारकांना एजन्सीमार्फत १५ दिवसांच्या आत प्रस्ताव दाखल करण्याची सूचना दिली आहे व मूदत पूर्ण होवूनही संबंधित एजन्सीला रूपये ७५१/- जमा करून प्रस्ताव दाखल केलेले नाहीत अशा मिळकत धारकांनी नोटीस मिळाल्याचे तारखेपासून ३० दिवसांच्या आत प्रस्ताव एजन्सीमार्फत सादर करावेत अन्यथा आकारण्यात येणाऱ्या विकास आकाराच्या १०% रक्कम ही दंडाच्या स्वरूपात आकारावी व सदर रक्कम विकास आकारासोबत मिळकतधारकास भरणे बंधनकारक करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. नारायण कुचे :१० टक्के जो दंड जो आहे तो आकारू नये . आमदार खासदार निधीतून गुंठेवारी भागात इंधनविहीरी ची कामे केली जातात. गुंठेवारी भागात पाण्याचा प्रश्न मोठा झालेला आहे उन्हाळयाचे दिवस असल्यामूळे हातपंप घेण्यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतून परवानगी देण्यात यावी.

डॉ. भागवत कराड : गुंठेवारी काही भागात टँकरद्वारे पाणी पूरवठा केला जातो. पाण्याची टंचाई जाणवत आहे. गुंठेवारी भागातील नागरीक आता पैसे भरत आहे. रेग्यूलाईज करून घेत आहे. गुंठेवारी भागात नगरसेवक निधीतून इंधनविहीरी घेण्याची परवानगी दयावी.

(याच वेळी सहा.संचालक नगररचना हे मा. महापौर यांचे सूचनेवरून सभागृहा बाहेर जातात.)

श्री. नारायण कुचे :काही गुठेवारी भागात नोटीसेस दिलेल्या नाही. ४० हजार पैकी २५ हजार लोकांना नोटीसेस दिलेल्या नाही अशा ठिकाणच्या लोकांकडून दंड कशाच्या अधारे आकारणी करणार आहे. वेळ वाढवून द्यावी.

श्री. शंशाक विसपूते :सदर एजन्सीकडून ७५० रूपयाची नोटीसेस मिळालेल्या आहेत परंतू दुसरी नोटीस जी चलनाची आहे त्यासाठी सदर एजन्सीला वेळ दिलेला असेल.काही एजन्सीने पहिल्या नोटीसेस देवून दोन महिणे झालेले आहे. त्या भागातील नागरीक स्वतहून पैसे देण्यात तयार असून घर रेग्यूलाईज करण्यास तयार आहे. परंतू जर नोटीस नागरीकापर्यंत पोहचण्यास उशीर होत असेल तर नागरीकांवर दंड का आकारावा. काही ठिकाणी चलनच्या नोटीसेस दिल्या मा. आयुक्तांनी हेरींगसाठी बोलविलेले होते. काही अधिकाऱ्याना सूचनाही दिल्या होत्याकी चलनाचे पैसे भरून घ्यावे. परंतू काही अधिकारी यांनी काही भाग गुंठेवारीत येत नाही आरक्षणचा मुद्या येतो. सध्या लोक पैसे भरण्यास तयार आहे. विकास कामांना गती मिळणार आहे. आरक्षणामूळे जर आडचण येत असेल तर तोही प्रश्न दूर करण्याचा प्रयत्न करावा. २००१ अगोदर बांधकाम झालेल्या घरांना रेग्यूलाईज करतो आहे परंतू त्यानंतरही अनेक ठिकाणी बांधकाम चालू आहे. जी जागा शिल्लक आहे जे रस्त्यासाठी जागा आहे. तेथे बांधकाम होत आहे. जी आज बांधकामे होत आहे ती थांबवली पाहिजे. प्लॉटींग करून अनधिकृत वस्ती होत आहे. काही भागात नोटीसेस न देता त्यांना दंड आकारणी करणे योग्य नाही.गुंठेवारी भागात टँकर ने पाणी दिले जाते परंतू काही भागात टँकर जात नाही. अशा भागात तरी गुंठेवारी संदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी.

श्री.साहेबराव कावडे :शहरात ११४ अनधिकृत वस्त्या आहेत. काही वसाहतीमधे विकास कामे झालेली आहे परंतू काही वसाहतीमधे जाणूनबूजून काम केलेले नाही. या वसाहतीचा अगोदर सर्वे करावा. कोणकोणत्या वसाहतीमधे कोणती विकास कामे झालेली आहे. काही वसाहतीमधे काहीच कामे केलेली नाही. शासनाकडून जे अनूदान येते त्यातून अनधिकृत भागात ड्रेनेज , पाणी व इतर सुविधा देण्यात याव्यात.

सौ.मेहर उन्नीसा खान : गुंठेवारी भागात ज्या नोटीसा दिलेल्या आहेत सदर रक्कम चार हप्त्यात नागरीक भरण्यास तयार आहे तशी परवानगी देण्यात यावी. काही भागात लोकांना अदयापपर्यंत नोटीसेस दिलेल्या नाही. तसेच १० टक्के दंड आकारणी करणे बरोबर नाही.

सौ.खान अजरा जबीन : गुंठेवारी भागात जो सर्वे झालेला आहे त्यानूंसार नागरीकांना फक्त एकच नोटीसेस दिलेल्या आहेत. बरेच लोकांच्या संचिका तयार आहेत. गुंठेवारी रेग्यूलाईज करण्यासाठी गती मिळत नाही. त्यामूळे लोकांना त्रास होत आहे ही प्रोसेस करण्यासाठी आणखी वेळ देण्यात यावा. दंड लावण्यात येवू नये. रेग्यूलाईज करण्यासाठी आणखी वेळ देण्यात यावा. सन २००१ च्या नंतरचे जे घरे झालेली आहे त्यांना गुठेवारीत रेग्यूलाईज करण्यासाठी कार्यवाही करावी. चार हप्त्यात गुंठेवारीची जी रेग्यूलाईज करण्याची रक्कम आहे ती घेण्यात यावी. मालमत्ता कर वसूलीसाठी वेगवेगळ्या भागात मंडप लावण्यात आले होते. तशी व्यवस्था गुंठेवारीसाठी देखिल करावी.

सौ. पार्वती वाघमोरे :वार्ड क्र ८२ मधे पाण्यासाठी टँकरचे लोक पैसे भरतात परंतू टँकर ६ दिवसा आड येते. पैसे भरणा केल्यानंतर वेळेवर पाणी यावे. या भागात पाईपलाईनची व्यवस्था

नाही. लाईटची दुरूस्ती करणार होते ते केंव्हा करणार आहे. याचाही खूलासा करावा.

डॉ. आशा बिनवडे : एका खाजगी संस्थेने सर्वे केलेला आहे व नोटीसेस दिलेल्या आहे असे यात म्हटले आहे. पण प्रत्यक्षात सगळयांना नोटीसा मिळालेल्या नाही. माझ्या वार्डात बराच भाग हा गुंठेवारीमध्ये येतो. वसंतनगर भागात एकही नोटीस मिळालेली नाही. न्यू शांतीनिकेतन कॉलनीत ७० टक्के नोटीसेस मिळालेल्या आहेत. असे असतांना ज्यांना नोटीसेस मिळालेल्या आहेत त्यांनी १५ दिवसाच्या आत प्रस्ताव दाखल केलेले नाही. तर त्यांना १० टक्के दंड आकारणी करावी. ज्यांना नोटीसा दिल्या त्यांनी पैसे भरणा केले नाही तर दंड आकारणार ज्यांना नोटीसेसच मिळाल्या नाही त्यांचे बाबतीत काय करणार आहे. जोपर्यत १०० टक्के लोकांना नोटीसेस जात नाही. तोपर्यत अशा प्रकारचा प्रस्ताव मंजूर करू नये. १० टक्के दंड आकारणी करण्यात येवू नये. भानुदासनगर भागात २०×३०चे प्लॉट आहे त्यांना एक नोटीस व २०×६० चा जो प्लॉट आहे दोन प्लॉटवर घर एकच असेल तर त्यांना दोन नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत. दोन वेळा दोन पावत्या दिलेल्या आहेत. दोन वेळेस पैसे वसूल केलेले आहे त्याचे छायाप्रत माझ्याकडे आहे.एजन्सी ही आर्क असोशिएट नावाची आहे. सदर एजन्सीचे लोक सांगतात की प्लॉट मोठा आहे एक प्लॉटसाठी एक संचिका करायची आहे.

मा.आयुक्त : दोन प्लॉट जरी वेगवेगळे बॉण्ड वर खेरदी केले असेल व लगत असेल तर संचिका एकच असावयास पाहिजे परंतू ते दोन्ही प्लॉट हे एकाच व्यक्तीचे असावयास पाहिजे. इमारत एक असेल मालक एकच असेल तर एकच नोटीस दयायला पाहिजे तशा सूचना देण्यात येतील.

श्री.साहेबराव कावडे :११४ वसाहतीचा सर्वे करणार की नाही याचा खूलासा करावा किती वर्ष या भागात काम केलेले आहे.

मा.आयुक्त : सन २००१ पूर्वी गुंठेवारी भाग रेग्यूलाईज करण्यासाठी कोणतेही नियम नव्हते. परंतू २००१ मधे शासनाने कायदा काढला व गुंठेवारी भाग नियमित करावा म्हणून आदेश काढले. शासनाने हे पण नमूद केले की त्यापूढे त्या भागात काम नियमित करण्यासाठी घर रेग्यूलाईज करून घेतले पाहिजे. २००१ पासून औरंगाबाद शहरात नवीन कामे गुठेवारी भागात करण्याचे बंद आहे. देखभाल दुरूस्तीची कामे सुध्दा बंद होती परंतू मागील वषी काही कामे देखभाल दुरूस्ती केलेली आहे. गुंठेवारी भागातून नियमित करण्यासाठी जे काही रक्क्म मिळणार आहे ती त्याच भागासाठी वापरण्यात येईल. या शहरात जवळपास ४० हजार घरे असतील. २६-२७ हजार घराचा सर्वेचे काम झालेले आहे. ७५० /-रूपये भरावे म्हणून काही लोकांना नोटीसेस दिलेल्या आहेत १५ दिवसाची मूदत दिलेली आहे.आणखी १५ दिवसाची मुदत देवू जर पैसे भरणा केले नाही तर दंड आकारावे नसता कुणीही पूढे येणार नाही व पैसे भरणा केले नाही तर तेथे काम करता येणार नाही.

श्री. साहेबराव कावडे :काही गुंठेवारीच्या भागात आजही कामे होत आहे ठराविक भागातच कामे का होत नाही.

मा.आयुक्त :देखभाल दुरूस्तीचीच कामे अशा भागात करता येतात. इतर नाही.

मा. महापौर :जर एकाच मालकाचे दोन प्लॉट असतील तर त्यांना दोन नोटीसेस न देता एकच नोटीस दयावी अशी सूचना करतो.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर :ज्या लोकांनी गूठेंवारीत येण्यासाठी पैसे भरणा केलेले आहे त्या भागात का कामे होत नाही.

मा. आयुक्त :१००० लोकांना चलन दिलेले आहे. त्यापैकी २५ ते ३० लोकांनी चलन भरणा केलेले आहे. पुंडलिकनगर भागात ६०० व इतर भागातील ४०० लोक आहे त्यांना चलन दिलेले आहे. चलन भरण्यासाठी लोक पूढे येत नाही. जे भरणार नाही त्यांचेवर १० टक्के दंड आकारावे असा प्रस्ताव आहे. या वर्षी गुंठेवारी भागातून ५ कोटी रूपये येणे अपेक्षीत आहे. तेच येणारी रक्कम गुंठेवारी भागात खर्च करता येईल. जर आले नाही तर खर्च करणार नाही.

श्री.मुजीब खान :गेल्या एक वर्षापासून गुंठेवारी भागाचा प्रश्न चालू आहे. मागिल बजेटमधे या भागात कामे करण्यासाठी दोन कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. अनेक कामे होतील अशी अपेक्षा होती परंतू प्रशासनाने गुंठेवारी भागात कामे केली नाही. या वर्षी पून्हा ५ कोटीची तरतूद केलेली आहे. सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर गुंठेवारी भागात काम का होत नाही. गुूंठेवारी भाग कोणता येतो व कोणता येत नाही याचाही खूलासा करावा. गावठाण भाग हा गुंठेवारीमधे येत नाही २५ ते ३० वर्षापासून वसाहती झालेल्या आहेत. जर नगरसेवकांना त्यांचे वार्डातील किती भाग हा गुंठेवारीमधे येतो हे जर माहित नसेल तर काय विकास कामे करणार आहे. माझा पूर्ण वार्ड आर -१ मधे येतो. रशीदपूरा. गणेशकॉल्नी. आलमगीर कॉल्नी आर-१ मधे येते. जुने शहर हे गावठाण मधे येते ते गुठेवारीत येत नाही. कोणकोणता भाग गुंठेवारीत येतो याची माहिती देण्यात यावी.

मा. महापौर :प्रशासनास अशा सूचना करण्यात येते की प्रत्येक वार्डात कोणता भाग गुंठेवारीत येतो व कोणत्या भागात कामे करता येतील व कोणत्या भागात करता येणार नाही या बाबतीत सर्व नगरसेवकांना लेखी देण्यात यावे.

श्री. रविकांत गवळी :ज्या एजन्सीकडे काम दिले होते त्यांनी अनेक लोकांना आणखी नोटीसेस दिलेल्या नाही ७५० रूपये भरण्यास लोक तयार आहे. असे असतांना दंड कसा आकारता येईल.

श्री. शंशाक विसपूते :ज्या आरक्षीत भागावर वसाहती झालेल्या आहेत तेथे गुंठेवारी लागू होणार आहे काय ?

मा.आयुक्त : आपले असे म्हणणे आहे की, ज्या भागात सर्वे झाला नाही, त्या भागात लोक पैसे भरण्यास तयार आहे. आपण सात एजन्सीकडे काम दिले, अपेक्षा अशी की, एक दिड महिन्यामध्ये ४०-४० हजार घराच्या सर्वेचे काम होईल. ऑलरेडी २६-३० हजार घरांचा सर्वे झालेला आहे. जो काही राहीला तो एक महिन्यात पूर्ण होईल. आणि ७५०/- रूपये भरावे, म्हणून नोटीसेस जातील. आरक्षणाच्या बाबतीत ॲक्ट फारच क्लीअर आहे. डी.पी.रस्ते सोडून बाकीचे जे आरक्षण ते ॲटोमेटीक लॅप्स होतात. त्यामध्ये एकच इश्युव आहे की, आज मी सांगितले होते, ऐनवेळी प्रस्ताव ठेवावा. प्लॅनींग ऑथर्टी म्हणून ठेवले पाहीजे. शासनाने असे दिले की, सर्वसाधारण सभेने असा निर्णय घ्यायला पाहीजे की, गुंठेवारीमध्ये जे काही आरक्षणांचे क्षेत्र आहे, ते आरक्षण वगळण्यास आमची सम्मती आहे. तसा प्रस्ताव मी ऐनवेळी ठेवणार होतो. आता सहा.संचालक नगर रचना कोणीही नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : यात जो काही दंड आकारणी करणार आहे तो लावण्यात येवू नये. २६ हजार घराचा सर्वेचे काम झालेले आहे. आणि ७५१/-रूपये भरणे सर्वांना शक्य आहे. असे केल्यास काम करण्यास सोयीस्कर होणार आहे. लोकांनी हे पैसे भरावे व नगरसेवकांनी त्यांना प्रोत्साहित करावे अशी आपली भुमिका असली पाहिजे. तसेच आताच म्हटल्या प्रमाणे जर आमदार खासदार निधीतून इंधनविहिरी घेण्याची परवानगी असेल तर सर्व नगरसेवकांना ज्यांना ज्यांना ज्या भागामधे

इंधन विहिरी घ्यावयाच्या आहे तेथे स्वेच्छा निधीतून घेण्याची परवानगी दयावी. जेथे गुंठेवारी भाग आहे व आरक्षण येते ते रस्ता सोडून आरक्षण वगळयाचा ठराव मंजूर करावा. तसेच देखभाल दुरूस्तीची कामे सर्व भागात करण्याच्या सूचना कराव्यात. ज्या १८ खेड्याचा समावेश महापालिका हद्यीत झालेला आहे त्यात जाधववाडी,सुरेवाडी,मिसारवाडी,पडेगाव,मिटमिटा इ. असतील. जे १८ खेडे आलेले आहे त्याची विकास करण्याची जबाबदारी महापालिकेने घेतलेली आहे. या भागात रस्ते करण्याचे काम महापालिकेला करावे लागणार आहे. १८ खेडे अंतर्गत जो विकास निधी आलेला आहे तो या वाडया तांडे किंवा वसाहती आलेल्या आहेत त्या ठिकाणी रस्ते करण्यात यावेत.

श्री. रविकांत गवळी : १० टक्के दंड आकारणी रद्य करावी.

डॉ. भागवत कराड : ज्या भागात नोटीसा दिलेल्या नाही त्या लोकांना वेळ दयावा. व सर्व कामे करण्याची परवानगी दयावी.

मा.महापौर : नगरसवेकांच्या स्वेच्छा निधीचे जे हात पंप आहे. हे सभागृह ७५१ रूपये जे गुंठेवारीचे आहे जे आपण सर्वे करू लागलो ते १०० टक्के आले, तर तेथे खर्च करण्याची परवानगी देवू. जे १० टक्के दंड आकारण्याचे दिले ते रद्द करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, विकास आकाराच्या १०% रक्कम ही दंडाच्या स्वरूपात आकारणी करणेस मंजुरी नाकारण्यात येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२२/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळाची बैठक फेब्रुवारी २००५ रोजी होणार होती. मंत्रीमंडळ बैठकीसाठी तयारीस्तव पाहणी मा.विभागीय आयुक्त तथा तत्कालीन मा.आयुक्त यांच्या उपस्थित झाली. यावेळी मा.विभागीय आयुक्त तथा मा.आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार सुभेदारी विश्रामगृहाकडे जाणाऱ्या रोडवर सहा पोल फिटींग व विभागीय आयुक्त कार्यालय परिसरात दोन पोल वरील चार फिटींग व चार सेट वर चार फिटींग (डेकोरेटीव्ह ) बसविण्यात आले होते. सदर काम सप्टेबंर २००५ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.

उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २,२५,१७९/- इतके होत आहेत. उपरोक्त काम हे उपलब्ध ठेकेदार मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात आले आहे.

वरील काम हे मा.विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार मंत्रीमंडळ बैठकीसाठी तात्काळ करण्यात आलेले आहेत.

तरी वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,२५,१७९/- चे काम मे.लूना इलेक्ट्रीकल्स यांच्या नावे कार्योत्तर मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा. महापौर :मंजूरी देण्यात येते.

श्री. सलीम पटेल :कोरम पूर्ण नाही पूढील विषय घेण्यात येवू नये.

मा. महापौर :कोरम पूर्ण आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुभेदारी विश्रामगृहाकडे जाणाऱ्या रोडवर सहा पोल फिटींग व विभागीय आयुक्त कार्यालय परिसरात दोन पोल वरील चार फिटींग व चार सेट वर चार फिटींग (डेकोरेटीव्ह) बसविण्यात आले होते. सदर काम सप्टेबंर २००५ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर कामाचे र.रू.२,२५,१७९/- च्या अंदाजपत्रकास मे.लूना इलेक्ट्रीकल्स यांच्या नावे कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेच्या सिडको एन-५, पाणीपुरवठा जलकुंभावरील ६० व १२० अं.श.क्षमतेचे एकूण चार व्ही.टी.पंप सन १९८४ मध्ये बसविण्यात आले आहे. पंप बसवून २१ वर्षे कालावधी पूर्ण झालेला आहे.पंपाचे आयुष्यमान साधारण १५ वर्षाचे असते. सदरील पंप जूने झाल्यामूळे वारंवार नादूरूस्त होत असून त्यांची कार्यक्षमता कमी झालेली आहे. यामुळे विद्युत देयकापोटी व दुरूस्तीकरीता जास्तीचा खर्च होत आहे.या सर्व बाबी लक्षात घेवून पंपीग मशिनरी योग्य त्या कार्यक्षमतेने व विना अडथळा चालण्यासाठी नविन पंप बसविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१२० अं.श.चे दोन व ६० अं.श.चे दोन याप्रमाणे एकूण चार व्ही.टी.पंप बदलण्यासाठी रू.२०,१९,६३५/- खर्च येतो. हा खर्च पंप दुरुस्ती व मशिनरी खरेदी या लेखाशिर्षातून करण्यात येईल. तरी सिडको एन-५ येथे १२० अं.श.व ६० अं.श.चे नविन पंप बसविण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेच्या सिडको एन-५, पाणीपुरवठा जलकुंभावरील १२० अं.श.चे दोन व ६० अं.श.चे दोन याप्रमाणे एकूण चार व्ही.टी.पंप बदलण्याच्या र.रू.२०,१९,६३५/- च्या खर्चास तसेच सदरील खर्च पंप दुरूस्ती व मशिनरी खरेदी या लेखाशिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इन्स्टीट्युट ऑफ हाऊसिंग अँड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दि.२८ मे ते १० जून २००६ रोजी थायलंड,मलेशिया व सिंगापुर येथे प्रकल्प नियोजन व व्यवस्थापन आणि प्रभावी नागरी प्रशासन व नागरी सुविधासाठी अर्थसहाय्य (Project planning and Management, Good Urban Governance and Financing Infrustructure) अल्पमुदतीची कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यशाळेस मा.महापौर, यांना निमंत्रित केले असून सदर कार्यशाळा लोकप्रतिनिधी व अधिकारी संवर्गासाठी आयोजित केलेली आहे.

सदर कार्यशाळेसाठी मा.महापौर आणि मा.महापौरांनी नियूक्त केलेले एक अधिकारी जाणार आहे. या कार्यशाळेत प्रकल्प व्यवस्थापन,प्रभावी नागरी प्रशासन व गरीबी निर्मूलन,कार्यक्षमता वाढविणे योग्य पध्दतीचे नियोजन करणे, भौतिक सुविधासाठी अर्थसहाय्य इत्यादी बाबत देखील प्रशिक्षण व तेथील विविध प्रकल्पांना भेटी देखील देण्यात येणार आहे. सदर कार्यशाळेसाठी निवास, भोजन व प्रवास ह्या अनुषंगाने होणारा खर्च प्रती व्यक्ती सुमारे ३.०० लक्ष रूपये अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे मा.महापौर व त्यांनी प्राधिकृत केलेला एक अधिकारी यांना या कार्यशाळेत भाग घेण्यासाठी खर्चास मान्यता देणेस व राज्य शासनाची परवानगी घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इन्स्टीट्युट ऑफ हाऊसिंग अँड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दि.२८ मे ते १० जून २००६ रोजी थायलंड,मलेशिया व सिंगापुर येथे प्रकल्प नियोजन व व्यवस्थापन आणि प्रभावी नागरी प्रशासन व नागरी सुविधासाठी अर्थसहाय्य (Project planning and Management, Good Urban Governance and Financing Infrustructure) अल्पमुदतीची कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यशाळेस मा.महापौर, यांना निमंत्रित केले असून सदर कार्यशाळा लोकप्रतिनिधी व अधिकारी संवर्गासाठी आयोजित केलेली आहे.

तसेच सदर कार्यशाळेसाठी मा.महापौर आणि मा.महापौरांनी नियूक्त केलेले एक अधिकारी जाणार आहे. या कार्यशाळेत प्रकल्प व्यवस्थापन,प्रभावी नागरी प्रशासन व गरीबी निर्मूलन,कार्यक्षमता वाढविणे

योग्य पध्दतीचे नियोजन करणे, भौतिक सुविधासाठी अर्थसहाय्य इत्यादी बाबत देखील प्रशिक्षण व तेथील विविध प्रकल्पांना भेटी देखील देण्यात येणार आहे. सदर कार्यशाळेसाठी निवास, भोजन व प्रवास ह्या अनुषंगाने होणारा खर्च प्रती व्यक्ती सुमारे र.रू.३.०० लक्ष अपेक्षित खर्चास तसेच राज्य शासनाची परवानगी घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, न्यु.नंदनवन कॉलनी, अभिनंदन कॉलनी, भुजबळनगर इत्यादी वसाहतीकडे पोच रस्ता उपलब्ध नसल्यामुळे तेथील नागरीक लष्करखात्याच्या जमिनीमधून ये-जा करतात. या रस्त्याच्या भूसंपादनाची रक्कम सन २००१ मध्ये रू.१४,७९,३३३/- लष्करखात्यास अदा करणेसाठी, ठराव पारीत झालेला होता. त्यानंतर सर्वसाधारण सभेत ठराव क्र.३१८/२ वगळण्यात आला. लगेच त्यानंतरच्या सर्वसाधारण सभेत तोच ठराव पुन्हा कायम करण्यात आला. त्या ठरावानूसार रक्कम रू.१९,३३,८००/- मनपा फंडातून लष्करास अदा करणेचा ठराव दि.१९.०६.२००३ च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.८३/६ च्या ठरावामध्ये दुरूस्ती करून पारीत झाला होता.

पारीत झालेल्या ठरावानूसार रू.१९,३३,८००/- चा धनादेश महानगरपालिकेतर्फे लष्करास देवून भूसंपादन करणे बाबत लष्कर खात्यास कळविण्यात आले होते. परंतू लष्कर खात्यातर्फे सदर रक्कमेचा धनादेश वरिष्ठ पातळीवर मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पाठविण्यात यावा असे कळवून धनादेश परत पाठविण्यात आला.परंतू आता लष्कर ॲथॉरीटी यांच्यातर्फे रस्त्याच्या जागेच्या मोबदल्या संदर्भात त्यांनी सदर रस्त्याच्य मोबदल्यात एस.टी.आर.नुसार रू.२५,०६,०२०/- इतकी रक्कम अदा करणेबाबत कळविले आहे.

तरी सदर वाढीव रक्कम रू.२५,०६,०२०/- चा प्रस्ताव नव्याने सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न्यु.नंदनवन कॉलनी, अभिनंदन कॉलनी, भुजबळनगर इत्यादी वसाहतीकडे पोच रस्ता उपलब्ध नसल्यामुळे तेथील नागरीक लष्करखात्याच्या जमिनीमधून ये-जा करतात. या रस्त्याच्या भूसंपादनाची एस.टी.आर.नुसार वाढीव र.रू.२५,०६,०२०/- अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महापालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितील लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त आहे. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शासन निकषानुसार प्रत्येक १ लाख लोकसंख्येस ०१ अन्न निरीक्षक या प्रमाणकाप्रमाणे अन्न निरीक्षक कार्यरत असणे आवश्यक आहे. लोकसंख्या विचारात घेता मनपा अस्थापनेवर १० अन्न निरीक्षक कार्यरत असणे आवश्यक आहे. परंतू सद्यस्थितीत मनपा अस्थापनेवर ०२ पदे मंजूर असून ०१ पद कायमस्वरूपी सेवेने भरण्यात आलेले असून ०१ पद रिक्त आहे. सदर पद भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. मनपा आरोग्य विभागास अन्न भेसळ परवाना, शहरातून अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा अंमलबजावणीसाठी विशेष मोहिम राबविण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडील अन्न निरीक्षकांची मदत घ्यावी लागते. अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. उपरोक्त बाब लक्षात घेता अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यासाठी मनपा अस्थापनेवर नव्याने (८) अन्न निरीक्षकांची पदे निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

करीता मनपा अस्थापनेवर आरोग्य विभागासाठी (८) अन्न निरीक्षक पद वेतन श्रेणी रूपये ५५००-१७५-९००० या वेतन श्रेणीत निर्माण करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट<br>सौ.लता दलाल } : महानगरपालिकेतील पात्र कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्यावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अस्थापनेवर आरोग्य विभागासाठी (८) अन्न निरीक्षक पद वेतन श्रेणी रूपये ५५००-१७५-९००० या वेतन श्रेणीत निर्माण करण्यास तसेच या पदासाठी महानगरपालिकेतील जे पात्र कर्मचारी आहे, त्यांना प्रथम प्राधान्य देवून, सदरील पदे भरणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२७/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना दि.१ एप्रिल १९९८ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून औरंगाबाद महानगरपालिकेकडे पुढील देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. हस्तांतरणाचेवेळी योजनेवरील कार्यरत तृतीय व चतुर्थ श्रेणीतील १०५ कर्मचारी हे कायमस्वरूपी मनपा अस्थापनेवर हस्तांतरीत करण्यात आले व तांत्रिक (अभियंता संवर्ग) कर्मचारी प्रतिनियुक्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून घेण्यांत आले. यात एक उपअभियंता (स्था.), एक उपअभियंता (यां.), चार कनिष्ठ अभियंता (स्था.) व दोन कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी/विद्युत) असे एकूण (०८) कर्मचारी होते.

वरील प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांपैकी चार कर्मचारी नियतवयोमानाने सेवानिवृत्त झालेले आहेत. यांचेजागी मनपा अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यांचेकडे सध्या अतिरिक्त कार्यभार देण्यांत आलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांचे कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी ०७ वर्षापेक्षा जास्त झाल्याने, त्यांच्या मुळ विभागात प्रत्यावर्तीत करण्याबाबत कळविलेले आहे.

सदर पाणी पुरवठा योजना ही औरंगाबाद महानगरपालिकेस चालवावयाची असल्यामूळे खालीलप्रमाणे नव्याने औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर पदनिर्मिती करावे लागतील. पदनिर्मितीस मान्यता झाल्यास खर्चाची टक्केवारी ३९.३९ अशी होईल. सन २००४-२००६ चे एकूण उत्पन्न १२१.११ कोटी, निव्वळ खर्च ४७.६३ कोटी, अस्थापना खर्च ३९.३२ असा आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | उपअभियंता | २ पदे (१ स्थापत्य, १ यांत्रिकी) | ८०००-२७५-१३५०० |
| २. | कनिष्ठ अभियंता | ६ पदे (४ स्थापत्य, १ यांत्रिकी, १ विद्युत) | ५५००-१७५-९००० |

करिता महानगरपालिका अस्थापनेवरील पदनिर्मितीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : जे कर्मचारी पाणी पूरवठयासाठी घेत आहोत ते कॉन्ट्रक्ट बेसवर घ्यावे त्याचे वेतन फिक्स करावे.

मा. महापौर : ठिक आहे आपली सूचना मान्य करण्यात येते दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर प्रस्तावित केल्याप्रमाणे,पदनिर्मिती करणेस आणि सदर पदे कॉन्ट्रक्ट बेसीसवर भरणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/११ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत शहरात निर्माण होणाऱ्या दररोजच्या ३६० मेट्रीक टन घनकचऱ्यावर शास्त्रीय प्रक्रीया करणे बंधनकारक आहे. या प्रक्रियाद्वारे या घनकचऱ्याचे रूपांतर खतात करणे व त्यानंतर त्याची शास्त्रशुध्द भूमीभरणा करणे बंधनकारक आहे.

सध्या नारेगांव येथे महानगरपालिकेचा कचरा डेपो आहे. तेथे कार्यरत असलेल्या सत्यम बायोफर्टीलायझरचा खतनिर्मिती कारखाना बंद असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे नारेगांव येथील कचरा डेपो दूसऱ्या जागेवर स्थलांतरीत करावयाचा आहे. त्यामूळे

१. नारेगांव येथील सध्या पडून असलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रशुध्द प्रक्रीया करून ती जागा शास्त्रशुध्दरित्या बंद करावी लागेल. यासाठी इच्छुक खाजगी संस्थाकडून प्रस्ताव मागवणे.

२. महानगरपालिकेच्या ताब्यात सध्या कचरा डेपो दुसरीकडे स्थलांतरीत करण्यासाठी अतिरिक्त जागा उपलब्ध नाही. त्यामूळे स्वत:च्या जागे सहित घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० प्रमाणे जागा महानगरपालिकेस विकसित करून देण्यासाठी खाजगी कंत्राटदारामार्फत स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रांमधून जाहीर सूचना प्रसिध्द करणे.

३. खाजगी कंत्राटदारामार्फत विकसित करून दिलेल्या जागेवर महानगरपालिका दररोज ३६० मेट्रीक टन जमा होणारा घनकचऱ्यावर शास्त्रीय प्रक्रीया करून, त्याचे खतात रूपांतर करणे व शास्त्रशुध्द भूमीभरण जागा विकसित करणे. यासाठी इच्छुकांकडून प्रस्ताव मागविणे.

वर नमुद केलेल्या तिन्ही कृति घनकचरा व्यवस्थापन हाताळणी व नियम २००० अंतर्गत तसेच मा.उच्च न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे लवकरात लवकर करणे आवश्यक आहे.

सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : महापालिकेच्या माध्यमातून १९९८ साली नारेगाव येथे कचऱ्यापासून खत बनवण्याचे कारखाना तयार केला होता. त्याची परीस्थिती काय आहे. जो मालक होते त्यांचेवर ॲक्शन झाली का त्यांनी किती खर्च केलेला आहे.

श्री. सलीम पटेल : बीओटीच्या विषयाला आमचा विरोध आहे. सभागृहात सदस्य सख्या कमी आहे कोरम नाही. मंजूरी देवू नये.

मा.महापौर : बीओटीला मंजूरी देत आहोत. कोरम आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव येथे महानगरपालिकेचा कचरा डेपो आहे. तेथे कार्यरत असलेल्या सत्यम बायोफर्टीलायझरचा खतनिर्मिती कारखाना बंद असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामूळे व मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे नारेगांव येथील कचरा डेपो दूसऱ्या जागेवर खालील नमुद केलेल्या तिन्ही कृति घनकचरा व्यवस्थापन हाताळणी व नियम २००० अंतर्गत तसेच मा.उच्च न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे स्थलांतरीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. नारेगांव येथील सध्या पडून असलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रशुध्द प्रक्रीया करून ती जागा शास्त्रशुध्दरित्या बंद करावी लागेल. यासाठी इच्छुक खाजगी संस्थाकडून प्रस्ताव मागवणे.

२. महानगरपालिकेच्या ताब्यात सध्या कचरा डेपो दुसरीकडे स्थलांतरीत करण्यासाठी अतिरिक्त जागा उपलब्ध नाही. त्यामूळे स्वत:च्या जागे सहित घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० प्रमाणे जागा महानगरपालिकेस विकसित करून देण्यासाठी खाजगी कंत्राटदारामार्फत स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रांमधून जाहीर सूचना प्रसिध्द करणे.

३. खाजगी कंत्राटदारामार्फत विकसित करून दिलेल्या जागेवर महानगरपालिका दररोज ३६० मेट्रीक टन जमा होणारा घनकचऱ्यावर शास्त्रीय प्रक्रीया करून, त्याचे खतात रूपांतर करणे व शास्त्रशुध्द भूमीभरण जागा विकसित करणे. यासाठी इच्छुकांकडून प्रस्ताव मागविणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/१२ :**

दिनांक १४.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.२२६ अन्वये मजनुहिल टेकडी येथील स्वामी विवेकानंद उद्यानात अप्पु घराचे धर्तीवर मनोरंजन पार्क उभारण्याचा प्रस्ताव मे.क्रिस्टल इंटरनॅशनल यांना प्रस्तावातील अ.क्र.१ ते ६ अटीस पात्र राहून देण्यास मंजूरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बी.ओ.एल.टी. तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बी.ओ.एल.टी. समितीच्या दिनांक १४.१०.२००५ रोजीच्या बैठकीत मजनु हिल टेकडी येथील विवेकानंद उद्यानात अप्पुघराचे धर्तीवर मनोरंजन पार्क उभारण्यास मान्यता प्राप्त आहे.

उपरोक्त मान्यतेस अधिन राहून विवेकानंद उद्यान येथील मनोरंजन केंद्र व अनुषंगिक विकास कामासाठी निविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.२४.१०.२००५ रोजी मंजुरी प्राप्त आहे. सदर प्रकल्पासाठीच्या निवेदस दि.२६.१०.२००५ रोजीच्या राज्य पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली. सदर कामासाठी निविदापुर्व बैठक दि.२८.१०.२००५ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात पार पडली. निविदापुर्व बैठकीत सदर निविदा अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले. विवेकानंद उद्यान येथील भागश: क्षेत्रात मनोरंजन केंद्र उभारण्याऐवजी उद्यानाचे पूर्ण क्षेत्र विकसित करण्यासाठी व मनोरंजन केंद्र आणि अनुषंगीक विकास कामासाठी फेरनिविदा कार्यवाही करणे. निविदा सूचनेस व्यापक प्रसिध्दी मिळण्यासाठी निविदा सूचना टाईम्स ऑफ इंडिया सह राष्ट्रीय पातळीवरील इतर वृत्तपत्रात प्रसिध्द करणे. या अनुषंगाने सदर कामासाठी दुसऱ्या वेळेसची निविदा सूचना राष्ट्रीय पातळीवरील तीन वृत्तपत्रात दि.१७.११.२००५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तसेच जास्तीत जास्त विकसक यांना निविदा स्पर्धेत भाग घेता येण्याच्या दृष्टीने दोन दुरूस्तीपत्रकाद्वारे मुदतवाढीसह प्रसिध्दी देण्यात आली. दुरूस्तीपत्रक-२ अन्वये प्रसिध्दीनुसार निविदा स्विकृतीची शेवटची तारीख दि.१२.१.२००६ होती.

निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत सदर प्रकल्पासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व त्या पुढे नमूद विकासक यांनी दाखल केल्या.

१. मे.क्रिस्टल इंटरनॅशनल, पुणे.

२. मे.राजेश के.भारूका, औरंगाबाद.

३. मे.रूबी ट्रेडर्स, औरंगाबाद.

प्राप्त निविदा छाननीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.२७.१.२००६ रोजी छाननी (इव्हॅल्युशन कमिटी) समितीची बैठक झाली. छाननी समितीने मे.रूबी ट्रेडर्स यांची निविदा पात्रता निकष पुर्तता होत नसल्याने नाकारली. पात्रता निकष पुर्तता होणाऱ्या पुढील दोन निविदा (१)मे.क्रिस्टल इंटरनॅशनल, (२) मे.राजेश के.भारूका यांच्या निविदा त्यांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या.त्याचे दर पुढे नमुद प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे.क्रिस्टल इंटरनॅशनल- | प्रिमीअम - रू.१०.०० लक्ष(रूपये दहा लक्ष फक्त)<br>विकसक कामावरील अंदाजपत्रकीय खर्च रू.३,५३,९२,१८२.००<br>(तीन कोटी त्रेपन्न लाख ब्याण्णव हजार एकशे ब्याऐंशी फक्त) |
| २) मे.राजेश के.भारूका- | प्रिमीअम - रू.५.०० लक्ष(रूपये पाच लक्ष फक्त)<br>विकासक कामावरील अंदाजपत्रकीय खर्च रू.३,१४,०१,०००.००<br>(तीन कोटी चौदा लाख एक हजार फक्त) |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकार दरापैकी १)मे.क्रिस्टल इंटरनॅशनल यांचा देकार दर तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम असल्याने सदर विकसक यांचेशी देकार दर वाटाघाटी करण्याचा निर्णय छाननी समितीने घेतला.

छाननी समितीने उच्चतम देकार दराचे विकसक मे.क्रिस्टल इंटरनॅशनल यांचेशी वाटाघाटी करण्याचे घेतलेल्या निर्णयाप्रमाणे मा.आयुक्त यांचे दालनात दि.३/२/२००६ रोजी संबंधीत विकसकासमक्ष वाटाघाटी बैठक पार पडली. सदर बैठकीस मा.आयुक्त, मा.शहर अभियंता, उप अभियंता (बोल्ट कक्ष) आणि संबंधीत विकसक मे.क्रिस्टल इंटरनॅशनलचे प्रतिनिधी श्री.अनिल भंडारी उपस्थित होते. सदर बैठकीत उभयपक्षी संमत मुद्यांचा गोषवारा पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे.

१. विवेकानंद उद्यान येथील मनोरंजन केंद्रासाठी निविदा भाडेपट्टा दर प्रती चौरस मीटर प्रतीवर्ष रूपया एक दराने एकूण क्षेत्रासाठी प्रतीवर्षी भाडेपट्ट्याची रक्कम आदमासे रू.९३,०००/-(त्र्याण्णव हजार)येते, त्याऐवजी भाडेपट्ट्याची एकत्रित रक्कम प्रतीवर्षासाठी वाढीव प्रमाणात म्हणजे रू.१,५०,०००/-(एक लक्ष पन्नास हजार) लागू करणे.

२. सदर उद्यान व मनोरंजन केंद्र विकसित करण्यासाठी विकासक यांचे देकार अंदाजपत्रक रू.३,५३,९२,१८२/- ऐवजी देकार अंदाजपत्रकात वाढीव कामासह रू.५,००,००,०००/- (पाचशे लक्ष) याप्रमाणे वाढ करावी. मुळ देकार दराव्यतिरिक्तचा वाढीव अंदाजपत्रकीय खर्च विकासक यांनी करारनाम्याचे नंतर पुढील दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात करावा लागेल.

३. सदर प्रकल्प विकसित करावयाचे कामाअधिन फन साईन्सचे वाढीव वापरास व पेयजल सुविधा वरील खर्च विकासक यांनी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

४. सदर विकास कामा अधिन उद्यानात बसविण्याचे खेळणीचा (प्ले इक्वीपमेंटस्)चा दर्जा भाडेपट्टा कराराचे (३० वर्षे) शेवटच्या वर्षीपर्यंत या पध्दतीने अपग्रेड करण्यास विकसक बांधील राहतील, की ज्यामुळे खेळणी (प्ले इक्वीपमेंटस्) पुढील किमान सात वर्षे चांगल्या वापरण्यायोग्य स्थितीत राहिल. २८ वे वर्षी खेळणीचा दर्जा विहित अटीप्रमाणे ठेवण्यासाठी खातरजमा करण्याची जबाबदारी तत्कालीन शहर अभियंता यांची राहिल.

५. प्रकल्पासाठीची भाडेपट्टा कालावधी गणना प्रकल्पाचा करारनामा (डेव्हलपमेंट करारनामा) चे दिवसापासून करण्यात येईल.

६. सदर विवेकानंद उद्यान येथील स्वामी विवेकानंद यांचे पुतळ्याचे पावित्र्य अबाधित राहण्याच्या दृष्टीने काळजी घेण्याची जबाबदारी विकसक यांची राहिल. प्रकल्पाचे नांव सध्या विवेकानंद उद्यान आहे त्यात अंशत: बदल करून प्रकल्पाचे नामाभिधान 'क्रिस्टल फन सिटी-विवेकानंद उद्यान' याप्रमाणे प्रस्तावित राहिल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी, सौ.लता दलाल : फक्त स्वामी विवेकानंद उद्यान असेच ठेवावे.

श्री. सलीम पटेल :कोरम नाही विषय मंजूर करू नये.

मा. महापौर :कोरम आहे. सदस्य संख्या मोजावी.विषयक्र १२ ते १५ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहिल टेकडी येथील स्वामी विवेकानंद उद्यानात अप्पु घराचे धर्तीवर मनोरंजन पार्क उभारण्याचा प्रस्ताव मे.क्रिस्टल इंटरनॅशनल यांना प्रस्तावातील अ.क्र.१ ते ६ अटीस पात्र राहून उद्यानाचे नांव स्वामी विवेकानंद उद्यान असेच ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३०/१३ :**

दिनांक २८.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.**२९४** अन्वये सिध्दार्थ उद्यान येथे बोल्ट तत्वावर विविध विकास कामे करण्यासाठी बोल्ट प्रकल्पासाठी मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बोल्ट तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बोल्ट समितीच्या १४.१०.२००५ रोजीचे बैठकीत सिध्दार्थ उद्यान येथे बोल्ट तत्वावर पुढील विकास कामे हाती घ्यावीत. वाहनतळ, तात्पुरते स्टॉल, टेरेस रेस्टॉरंट, कारंजे व अत्याधुनिक उपहारगृह, मनोरंजन केंद्रासाठी डॅशींग कारसह आधुनिक खेळणी बसविणे ही उद्यान विकासाची कामे करण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

उपरोक्त निर्देशास अधिन राहून बोल्ट तत्वावर सिध्दार्थ उद्यान विकसित करणेसाठी निविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.६.१२.२००५ अन्वये मान्यता प्राप्त आहे. बोल्ट तत्वावर सिध्दार्थ उद्यान विकसित करण्याचे रू.३९८.०० लक्ष किंमतीचे निविदे अधिन प्रामुख्याने पुढील विकास कामे अंतर्भूत आहेत. सिध्दार्थ उद्यान येथील एकतीस एकर क्षेत्रातील मुख्य रस्त्यास लागून असलेले क्षेत्रात पुढील विकास

कामे करणे. या क्षेत्रापैकी मनपासाठी वाहनतळ (५७०८ चौ.मी.) बांधणे, अद्यावत प्रवेशद्वार (६० चौ.मी.) बांधणे आणि विकसकाचे हिश्श्यात २३७३ चौ.मी.क्षेत्रावर दुकान केंद्र व अद्यावत उपहारगृह बांधणे व ९३५ चौ.मी.क्षेत्रात मनोरंजनासाठी अद्यावत खेळणी बसविणे याप्रमाणे क्षेत्र विकासाची कामे बोल्ट निविदा अधिन पूर्ण करावयाची आहेत. वरील क्षेत्र विकासातील वाहनतळ, प्रवेशद्वार या मनपास मिळणाऱ्या बांधीव क्षेत्राशिवाय म.न.पा.कडून विकसकास ९९ वर्षे भाडेतत्वावर द्यावयाचे क्षेत्रापोटी विकसकाने म.न.पा.स रू.६० प्रति चौ.मी.प्रतिवर्ष दराने लीज रेंट आणि विना परतावा प्रिमीयम या मनपासाठी जमेच्या बाजू राहणार आहेत.

वर नमूदप्रमाणे बोल्ट तत्वावर हाती घेतलेल्या प्रकल्पाची जाहिर निविदा सूचना (पहिली वेळ) दि.९.१२.२००५ रोजी राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा स्विकृतीचे शेवटचे दिनांकापर्यंत फक्त एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदाचे तांत्रिक लिफाफा छाननी दरम्यान सदर निविदा पात्रता निकष पूर्तता करीत नसल्याचे आढळले. त्यामुळे सदर निविदा नाकारून फेरनिविदा कार्यवाहीस मा.आयुक्तांनी दि.२१.१.२००६ अन्वये मान्यता दिली आहे. फेरनिविदा कार्यवाही अंतर्गत सदर प्रकल्पासाठी जाहिर निविदा सूचना (दुसरी वेळ) राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात दि.४.२.२००६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा स्विकृतीचे शेवटचे दिनांकापर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. तीन्ही निविदा पात्रता निकष पूर्तता करीत असल्याने निविदाचे वाणिज्य देकार दराचा लिफाफा उघडण्यात आला व त्याची छाननी करण्यात आली. प्राप्त झालेल्या तीन्ही निविदाचे वाणिज्य देकार दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

१. मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स (अँड जेव्ही) देकार दर रू.३९.०० लक्ष प्रथम उच्च दर
२. मे.तेजस कन्स्ट्रक्शन (अँड जेव्ही) देकार दर रू.२५.९२ लक्ष
३. मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) देकार दर रू.११.०० लक्ष

वर नमूद प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांचा देकार दर रू.३९.०० लक्ष (रूपये एकोणचाळीस लक्ष) एवढा व उच्चतम आहे.

सदर विकसक यांनी निविदेसवोबत दाखल केलेल्या नकाशाचे व देकार दराचे छाननी करून त्याबाबतचा छाननी करून फीजीबीलीटी अहवाल प्रकल्पाचे पी.एम.सी. यांनी कार्यालयास दाखल केला आहे. त्यानुसार निविदा कार्यवाहीत प्राप्त झालेली उच्चतम देकार दराची मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांचा वाणिज्य देकार दर रू.३९.०० लक्ष (एकोणचाळीस लक्ष रूपये) आहे. हा दर महानगरपालिकेस लाभदायी (Beneficial) आहे. तरी त्यानुसार सदर बोल्ट प्रकल्पासाठी मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांची रू.३९.०० लक्ष (एकोणचाळीस लक्ष रूपये) देकार दराची निविदा मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथे बोल्ट तत्वावर विविध विकास कामे करण्यासाठी बोल्ट प्रकल्पासाठी मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांची र.रू.३९.०० लक्ष (एकोणचाळीस लक्ष रूपये) ची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३१/१४ :**

दिनांक २८.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.**२९५** अन्वये शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण क्र.२६२ आठवडी बाजार संकुलाचे उभारणीसाठी मे.पृथ्वी इंटरप्रायजेस अँड जेव्ही यांची निविदा स्विकारणेस मंजूरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बोल्ट तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बोल्ट समितीच्या १४.१०.२००५ रोजीचे बैठकीत शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण क्र.२६२ आठवडी बाजार संकुलाचे उभारणीसाठी निविदा कार्यवाहीचे निर्देश प्राप्त आहेत.

सदरहु आठवडी बाजार संकुल आरक्षण क्षेत्राची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेतलेली आहे. उपरोक्त मान्यतेस अधिन राहुन सदरहु आठवडी बाजार संकुल प्रकल्प ९९ वर्षे भाडेतत्वावर (विकसक हिश्श्यातील भाग) देवून आनुषंगिक निविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.६.१२.२००५ अन्वये मान्यता प्राप्त आहे. बोल्ट तत्वावर आठवडी बाजार संकुल विकसित करण्याचे रू.५५९.०० लक्ष किंमतीचे निविदा कामा अधिन पुढील प्रमाणे विकास कामे समाविष्ट आहेत. प्रकल्पाचे एकूण क्षेत्र (१५८८१ चौ.मी.+ १०००० चौ.मी.नाला क्षेत्र) यातून मनपासाठी १०००० चौ.मी. क्षेत्रावर आठवडी बाजारसाठी कॉंक्रीट अस्तरीकरण पृष्ठभागासह विकास करणे, मनपासाठी ४० दुकानांचे बांधीव क्षेत्र २४०.०० चौ.मी., पार्कींग आणि डेव्हलपमेंट आणि प्रकल्प स्थळातून जाणाऱ्या नाल्याचे रिअलायनींग करून चॅनलाईजींग करणे ही कामे मनपाचे हिश्श्यात राहतील. त्याशिवाय विकसकास द्यावयाचे क्षेत्रासाठी लीज रेंट रू.६०/- प्रति चौ.मी. प्रतिवर्ष दराने विकसकाचे क्षेत्रापासूनचे भाडे आणि विना परतावा प्रिमीयम या मनपाच्या जमेच्या बाजु राहतील. या बदली म.न.पा.कडून विकसकास ५८८१ चौ.मी. एवढे चटईक्षेत्र ९९ वर्षे भाडे करारान्वये द्यावे लागणार आहे.

वर नमूदप्रमाणे बोल्ट तत्वावरील प्रकल्पासाठी जाहिर निविदा सूचना (पहिली वेळ) दि.९.१२.२००५ रोजी राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा कार्यवाही दरम्यान निविदा स्विकृतीचे शेवटचे दिनांका पर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाचे तांत्रिक लिफाफा छाननी दरम्यान तीन्ही निविदा पात्रता निकषांची पुर्तता करीत नसल्याने सदर तीन्ही निविदा नाकारण्यास व फेरनिविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.२१.१.२००६ अन्वये मान्यता प्राप्त आहे. त्या अनुसार सदर प्रकल्पासाठी जाहिर निविदा सूचना (द्वितीय वेळ) राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात दि.४.२.२००६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली.

सदर निविदा स्विकृतीचे शेवटचे दि.२८.२.२००६ पर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या.सदर चार निविदाचे तांत्रिक लिफाफा छाननीनंतर मे.डी.एम.कन्स्ट्रक्शन्स यांची निविदा पात्रता निकष पूर्तता करीत नसल्याने सदर निविदा नाकारण्यात आली आणि पुढे नमूद प्रमाणे तीन निविदाचा वाणिज्य देकार दर लिफाफा उघडण्यात आला व छाननी केली.त्यानुसार तीन्ही निविदाचे वाणिज्य देकार दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) | दर रू.७९.०० लक्ष प्रथम उच्च |
| २. मे.अप्लाइड कन्स्ट्रक्शन्स (अँड जेव्ही) | दर रू.७२.०० लक्ष |
| ३. मे.तेजस कन्स्ट्रक्शन्स (अँड जेव्ही) | दर रू.२५.०० लक्ष |

वर नमूद प्रमाणे प्राप्त निविदाचे वाणिज्य देकार दरापैकी मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) यांचा देकार दर रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष रूपये फक्त) हा तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम आहे.

सदर विकसक यांनी निविदा सोबत दाखल केलेल्या नकाशा व देकार दराचे छाननी करून त्याबाबतचा फीजीबीलीटी अहवाल प्रकल्पाचे पी.एम.सी. यांनी कार्यालयास दाखल केला आहे. त्यानुसार निविदा कार्यवाहीत प्राप्त झालेली उच्चतम देकार दराची मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) यांचा वाणिज्य देकार रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष) हा दर महानगरपालिकेचे दृष्टीने लाभदायी (Beneficial) आहे. तरी त्यानुसार सदर बोल्ट प्रकल्पासाठीची मे.पृथ्वी इंटरप्रायजेसअँडजेव्हीयांची रू.७९.००लक्ष (एकोणऐंशी लक्ष रूपये)देकारदराची निविदा मा.सर्वसाधारणसभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण क्र.२६२ आठवडी बाजार संकुलाचे उभारणीसाठी मे.पृथ्वी इंटरप्रायजेस अँड जेव्ही यांची र.रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष रूपये) ची निविदा स्विकारणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २३२/१५ :</u>**

दिनांक २८.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.**२९६** अन्वये रेल्वेस्टेशन महापौर बंगल्या जवळील न.भू.क्र.१९१४९ वरील व्यापारी संकुल व प्रशासकीय इमारत

उभारणीसाठी बोल्ट प्रकल्पासाठी मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बी.ओ.एल.टी.तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बी.ओ.एल.टी.समितीची, रेल्वे स्टेशन महापौर बंगल्या जवळील न.भू.क्र.१९१४९ वरील व्यापारी संकुल व प्रशासकीय इमारत उभारणीसाठी निविदा कार्यवाहीचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर न.भू.क्र.१९१४९ ही महानगरपालिकेच्या मालकीची ११०५९.५१ चौ.मी. क्षेत्र महापौर बंगल्यासहीत असून सदर ठिकाणी प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुल क्षेत्र ६३३२.६२ चौ.मी. बांधणेसाठी व बांधीव क्षेत्र ५७९२.६२ चौ.मी. विकसक यांना ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर (विकास हिश्श्यातील भाग) देणेसाठी निविदा काढण्यासाठी निर्देश असून बोल्ट तत्वावरील प्रकल्पासाठी जाहीर निविदा सूचना दि.४.२.२००६ रोजी राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. दि.३.३.२००६ रोजी निविदापूर्व बैठक (Prebid) मा.आयुक्त यांचे दालनात घेण्यात आली. निविदापूर्व बैठकीत सदर निविदा अनुषंगाने विकसक यांचेसाठी लागू असलेली पात्रता निकष विकसक यांना समजावून सांगितले. निविदा स्वीकृतीची शेवटची तारीख दि.७.३.२००६ होती.

निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत सदर प्रकल्पासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व त्या पुढे नमूद विकसक यांनी दाखल केल्या.

१. मे. औरंगाबाद बिल्डर्स व डेव्हलपर्स

२. मे.तेजस कन्स्ट्रक्शन (व जे.व्ही.)

३. मे. शलाका इंजिनियर्स

निविदा तीन लिफाफा पध्दतीनुसार मागविण्यात आल्या असून प्राप्त निविदा छाननीसाठी लिफाफा उघडण्यात आला असता मे.शलाका इंजिनियर्स यांची निविदा पात्रता निकष पूर्तता होत नसल्याने नाकारण्यात आली. इतर दोन निविदाची निविदा प्रक्रिया पध्दतीनुसार लिफाफा क्र.१ ची छाननी करण्यात आली व पात्रता निकष पूर्ण होणाऱ्या दोन निविदा पुढील प्रमाणे आहे.

१)मे.औरंगाबाद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स २)मे.तेजस कन्स्ट्रक्शन(जे.व्ही.) यांचे लिफाफा क्र.२ उघडण्यात आले व छाननीअंती पात्र असल्याने लिफाफाक्र.३उघडण्यात आला.त्यांचे दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. मे.औरंगाबाद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स | प्रिमीयम रू.१,७१,१७,११७.११ |
| २. मे. तेजस कन्स्ट्रक्शन (अँड जे.व्ही.) | प्रिमीयम रू.२,७०,९२,०९२.०० |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकार दरापैकी मे.तेजस कन्स्ट्रक्शन अँड जे.व्ही. यांचा दर तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम प्राप्त आहे. सदर प्रकल्पाचे भुखंड क्षेत्र ११०५९.५१ चौ.मी. असून देय चटई क्षेत्र ७६४४.९४ चौ.मी. एवढे आहे. त्यापैकी विकसक यांना ९९ वर्षे भाडे तत्वावर द्यावयाचे बांधीव क्षेत्र ५७९२.६२ चौ.मी. एवढे आहे. सदर बांधीव क्षेत्रासाठी ९९ वर्षासाठी भाडेपट्टा दर रू.१०/- प्रति चौ.मी. प्रतिमाह या प्रमाणे राहणार आहे. आणि विकसकाकडून मनपास बांधुन द्यावयाचे क्षेत्र ५४० चौ.मी. (Stilt २६५.००चौ.मी. क्षेत्रासह)एवढे आहे. याशिवाय भूखंड विकासा अधिन रस्ते, पथदिवे, जलवाहिनी, जलनि:सारण वाहिनी, खुली जागा विकास,पार्कींग विकास ही कामे विकसकाचे खर्चाने करणे विकसकास बंधनकारक राहणार आहे.

तरी वरील प्रमाणे मे.तेजस कन्स्ट्रक्शन अँड जे.व्ही. यांचे उच्चतम देकार दर रू.२,७०,९२,०९२/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर (Lease Rent) प्रकल्प विकसित करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,रेल्वेस्टेशन महापौर बंगल्या जवळील न.भू.क्र.१९१४९ वरील व्यापारी संकुल व प्रशासकीय इमारत उभारणीसाठी बोल्ट प्रकल्पासाठी मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांची र.रू.२,७०,९२,०९२/- निविदा स्विकारणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/१६ :**

दिनांक २८.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.**२९३** अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध समाज मंदीर, व्यायामशाळा, सभागृह व मंगल कार्यालय व बहुउद्येशीय हॉल खाजगी संस्था/व्यक्तींना भाड्याने देण्यास मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध समाज मंदीर, व्यायामशाळा, सभागृह व मंगल कार्यालय व बहुउद्येशीय हॉल अशा इमारती आहेत. या पैकी काही इमारती मा.खासदार व मा.आमदार यांच्या निधीतुन बांधण्यात आलेल्या आहेत. सद्यपरिस्थिती यातील काही इमारती मनपाच्या विविध कार्यालयाच्या ताब्यात आहेत. उदा.वॉर्ड अ ते फ, प्रकल्प विभाग, क्रिडा विभाग, शिक्षण विभाग यांच्या ताब्यात आहेत. काही माजी नगरसेवक तसेच खाजगी व्यक्तीच्या / संस्थेच्या ताब्यात आहेत. त्यामुळे मनपाच्या मालमत्ता विभागाने या इमारतीवर सुरक्षा व देखभालीसाठी कोणतेही व्यवस्था केलेली नाही. या इमारती ज्यांच्या ताब्यात आहे ते लोक काही विशिष्ट व्यक्तीसाठी किंवा कार्यासाठी त्याचा वापर विशिष्ट कालावधी करताच करतांना आढळले. तसेच मनपा याबाबत कोणतेही शुल्क/भाडे आकारत नसल्यामुळे या इमारतीची दुराव्यवस्था झालेली आहे. या इमारतींना किरकोळ दुरूस्ती करून तातडीने भाड्याने देणे अत्यंत आवश्यक आहे. या इमारती भाड्याने देतांना या इमारतीचे भाडे नियमाप्रमाणे आकारून व अनामत रक्कम ही स्विकारणे योग्य होईल. जेणे करून नोंदणीकृत संस्थेस अथवा व्यक्तीस इमारत भाडेतत्वावर दिल्यानंतर मनपास उत्पन्न मिळु शकेल.

या इमारतीपैकी ज्या इमारती मा.खासदार व मा.आमदार यांच्या निधीतुन बांधली असल्यास अशा इमारती धर्मादा संस्थेस (नोंदणीकृत) त्यास नियमाप्रमाणे भाडे जे भाडे समिती ठरवेल त्यानुसार आकारून संबंधित मा.खासदार व मा.आमदार हे ज्या संस्थेची शिफारस करतील, त्या संस्थेस / व्यक्तीस प्रथम प्राधान्याने देण्यात योग्य होईल.

ज्या इमारतीत मनपा फंडातुन बांधले आहे, त्या इमारतीचे भाडे ठरवुन आयुक्त द्वारा संबंधित सोबत जोडलेले तक्त्यातील इमारत नियमानुसार येणाऱ्या भाड्याने व अनामत रक्कमेचा व इतर इमारत शहराच्या भागात / रेखांकनात असेल तेथील नागरीक कृती समिती अथवा रेखांकनातील नागरीकांचे ना हरकत प्रमाणपत्र आणण्याच्या अटीवर देय करणे योग्य होईल.

जेणे करून यातुन मनपातर्फे जेथे जनतेसाठी प्रस्ताव राबविण्यात येत असतील उदा. आरोग्य केंद्र वाचनालय, बालवाडी इत्यादी तर अशा इमारती वगळुन इतर इमारती निविदा / बोली अन्वये भाड्याने देण्यात येतील. इमारती भाड्याने दिल्यावर सदर भाडेपट्टा कालवधीतील संपुर्ण देखभाल दुरूस्ती, विद्युत, पाणी, व्यवस्थापन खर्च हा संबंधित संस्थेला / व्यक्तीस करावा लागेल. मनपा ह्या खर्चाचा मोबदला देणार नाही. या शिवाय मनपाच्या नेहमीच्या अटी शर्तीवर स्वखर्चाने करारनामा करणे संबंधित संस्था / व्यक्तीस करावा लागेल.

तरी वरील प्रमाणे औरंगाबाद शहरातील मनपाच्या इमारती भाडेतत्वाने खाजगी संस्था / व्यक्तींना देणे बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. या इमारतींना भाडे शासन नियमाप्रमाणे भाडे समिती ठरविल त्याप्रमाणे आकारून कार्यवाही करून करण्याची अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांना देण्यात यावे. भाडे समितीने ठरविलेल्या भाडे संबंधी वाद झाल्यास सदर भाडे अंतिम ठरविणे बाबत मा.स्थायी समितीस संपुर्ण अधिकार राहील. ही संपुर्ण कार्यवाही येत्या तीन महिन्यात पुर्ण करणे प्रशासनावर बंधनकारक राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड :जर एखादे कार्यालय,सभागृह मा.आमदार खासदार निधीतून बांधलेले असेल तर त्याचे शिफारशीनूसार मंजूर करू नये. त्या त्या कॉलनी तील नागरीकाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. हा विषय नामंजूर करावा.

डॉ. आशा बिनवडे :या प्रस्तावात असे आले की ज्या इमारती पैकी मा. आमदार किंवा खासदार निधीतून बांधलेली असल्यास अशा इमारती नियमाप्रमाणे जे भाडे असेल ते देण्याकरीता त्यांचे शिफारस पत्र घ्यावे. त्यांना प्राधान्य क्रम दयावे. परंतू यातून आणखी काही घडू शकते ते आपल्या निदर्शनास आणून देते. की माझ्या वार्डात एक व्यायाम शाळा १२ वर्षापूर्वी माजी आमदार विधान परीषद सदस्य यांचे निधीतून बांधलेली होती.आज परीस्थिती अशी आहे की त्यांनी त्याचे संस्थेसाठी म्हणून स्वत:चे कूलूप लावून ठेवलेले आहे. गेल्या १२ वर्षापासून त्या इमारतीचा उपयोग घेवून शकत नाही. तीन वर्षापूर्वी एका हरीओम नावाच्या संस्थैला ती व्यायाम शाळा भाडे तत्वावर दिली होती. आणि त्यांचेकडून ४८ हजार रूपये भाडे डिपॉजीट करून घेतले होते. परंतू संबधीत आमदार यांनी तेथे स्वत:चे कूलूप लावल्यामूळे त्यांनी असा आग्रह धरला की ही शाळा माझ्या स्थानिक निधीतून झालेली आहे. ती माझ्याच संस्थेला मिळावी. म्हणून ती शाळा आजही त्यांचे ताब्यात आहे. मनपास आलेले डिपॉजीट परत करावे लागले. महापालिकेचे नुकसान झाले आहे. त्यामूळे हा ठराव मंजूर करू नये.या प्रस्तावास माझा विरोध असून ज्या आमदारानी त्या व्यायाम शाळेला अनधिकृत पणे कुलूप लावलेले आहे. त्यांचेवर आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे.

मा. महापौर :विषय क्र १६ स्थगित करण्यात येतो. विषय क्र १७ ते २२ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २३४/१७ :**

औरंगाबाद महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी वस्तु संग्रहालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र ही केंद्रे तयार केली आहे. जानेवारी २००६ च्या सर्वसाधारण सभेमध्ये मौलाना आझाद संशोधन केंद्रासाठी ठराव पारीत केला आहे. वरील तीनही संस्था/उपक्रम हे एकाच धर्ती आधारे मनपाने सुरू केले आहेत. त्यामूळे तिनही महापुरूषांचे यथा उचित सन्मान होणे आवश्यक आहेत. त्यामूळे तिनही संस्था, उपक्रम व केंद्रे यांना अस्थापनावरील अधिकारी व कर्मचारी एकाच दर्जाचे असावेत. तिनही केंद्रातील महापुरूषांच्या जिवनावर अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना सारख्याच रकमेचे व सारख्याच दर्जाचे पुरस्कार देण्यात यावेत. साहित्य खरेदीसाठी सारखीच रक्कम उपलब्ध करून घ्यावी. छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शालेय शिक्षणात संस्कृत हा विषय घेवून उत्तीर्ण असलेल्यांना प्राधान्य देण्याची अट घालणे आवश्यक राहील. याकरीता ठराव पारीत करण्यात यावा व पुढील वैधानिक कार्यवाही मा.आयुक्त व शहर अभियंता यांनी करावी.

सूचक : श्री.पुरूषोत्तम रघुवीरसिंह ठाकुर

अनुमोदक : श्री.विनायक पांडे,श्री.सतिष कटकटे,श्री.रविकांत गवळी, श्री.संजु रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी वस्तु संग्रहालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या शालेय शिक्षणात संस्कृत हा विषय घेवून उत्तीर्ण असलेल्यांना प्राधान्य देण्याची अट घालणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५/१८ :**

विद्युत कॉलनी (बेगमपुरा) भागात सध्याची दगडी गटार काढून त्या ठिकाणी नविन ४५० मी.मी. व्यासाची प्रिकास्ट आरसीसी अर्ध गोलाकार सरफेस गटार बांधणे, त्यावर प्रिकास्ट कव्हर बसविणे व रोड क्रॉस ठिकाणी लोखंडी जाळी टाकणेचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. या कामाकरीता रक्कम रूपये ५.००

लक्षचा खर्च अपेक्षित आहे. अर्थसंकल्पातील शहरी भागात खूल्या गटारी या लेखाशिर्षातंर्गत (अ.क्र.०६ पान क्र.१८५) वर रू.३.०० लक्ष तरतूद असून भांडवली कामे जलनि:सारण या लेखाशिर्षातंर्गत (अ.क्र.०५ पान क्र.१७८) वर रू.२.०० लक्षची असलेली तरतूद अशी एकूण रूपये ५.०० लक्षची तरतूद उपरोक्त अर्ध गोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता वळती करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सूचक : श्री.विनायक (गणू) पांडे अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्युत कॉलनी (बेगमपुरा) भागात सध्याची दगडी गटार काढून त्या ठिकाणी नविन ४५० मी.मी. व्यासाची प्रिकास्ट आरसीसी अर्ध गोलाकार सरफेस गटार बांधणे, त्यावर प्रिकास्ट कव्हर बसविणे व रोड क्रॉस ठिकाणी लोखंडी जाळी टाकणेच्या कामासाठी अपेक्षित खर्च र.रू.५.०० लक्ष, अर्थसंकल्पातील शहरी भागात खूल्या गटारी या लेखाशिर्षातंर्गत (अ.क्र.०६ पान क्र.१८५) वर रू.३.०० लक्ष असलेली तरतूद तसेच भांडवली कामे जलनि:सारण या लेखाशिर्षातंर्गत (अ.क्र.०५ पान क्र.१७८) वर रू.२.०० लक्षची असलेली तरतूद अशी एकूण रूपये ५.०० लक्षची तरतूद उपरोक्त अर्ध गोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३६/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७३ एस.टी.कॉलनी एन-२ येथील सर्वे नं.६८ मधील कामगार चौकात 'प्रबोधनकार ठाकरे' यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास या परिसरातील ज्येष्ठ नागरीक यांनी सन १९८७ पासून वारंवार मागणी करीत आहे.

करीता सदर प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.शिंदे दामोधर माधवराव

अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.नारायण कुचे

**संवाद :**

श्री.दामोधर शिंदे : सर्वे नं.६८ ऐवजी ७० अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७३ एस.टी.कॉलनी एन-२ येथील सर्वे नं.७० मधील कामगार चौकात 'प्रबोधनकार ठाकरे' यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३७/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उत्सव मंगल कार्यालयाजवळील चौकास 'स्वातंत्र्य सैनिक कै.कमलाकर रामचंद्रराव देशपांडे चौक' असे नांव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.रेणुकादास वैद्य अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.विनायक पांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उत्सव मंगल कार्यालयाजवळील चौकास 'स्वातंत्र्य सैनिक कै.कमलाकर रामचंद्रराव देशपांडे चौक' असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.९, नंदनवन कॉलनी येथील मुख्य चौरस्ता ह्या चौकात 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज' यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत या भागातील नागरिकांकडून मागणी होत आहे. नागरीकांनी केलेली मागणी विचारात घेता सदरील चौकात उपरोक्त पुतळा उभारणे आवश्यक आहे.

करीता प्रभाग क्र.९, नंदनवन कॉलनी भागातील मुख्य चौकात 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे' बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर. सदरील पुतळ्यासाठी लागणारा खर्च सन २००६-२००७ या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यांत येवून मंजूर करणेस्तव सादर.

सूचक : श्री.पुरूषोत्तम ठाकुर

अनुमोदक : १.श्री.संजय शिरसाट, २.श्री.भगवान (बापु) घडमोडे, ३.श्री.विनायक पांडे, ४.श्री.त्र्यंबक तुपे, ५.श्री.सतिष कटकटे, ६.सौ.रजनी जोशी, ७.सौ.कला बोरामणीकर, ८.श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९, नंदनवन कॉलनी भागातील मुख्य चौकात 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस व सदरील पुतळ्यासाठी लागणारा खर्च सन २००६-२००७ या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३९/२२ :**

प्रभाग क्र.८२, भारतनगर,मातोश्रीनगर या परिसरातील लोकसंख्या अंदाजे १५००० हजारच्या जवळपास असून या भागातील नागरीकांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी या परिसरात महानगरपालिकेची शाळा नाही. तसेच कूठल्याही संस्थेची शाळा या परिसरात चालू नसल्यामूळे या भागातील मुलांना शिक्षण घेण्यासाठी अत्यंत गैरसोय होत आहे, यामूळे ही मुले शिक्षण घेण्यापासून वंचित राहत आहे. तर काही मुले दोन किलो मीटर दुरवर अंतर चालून जात शिक्षण घेत आहे.

या परिसरातील नागरीकांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी भारतनगर येथे महानगरपालिकेची शाळा उघडण्यात यावी याबाबत परिसरातील मागणी करत आहे. या भागात शाळेसाठी प्रशस्त जागा भाड्याने उपलब्ध होवू शकते.

या भागातील रहिवाशांची शाळेची मागणी व मुलांची शिक्षणाबाबत अभावी होणारी गैरसोय विचारात घेवून या परिसरात महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सुरू करण्यात यावी. जेणे करून या परिसरातील नागरीकांची मुले शालेय शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.पार्वताबाई विजय वाघमारे

अनुमोदक : १.सौ.वीणा गजेंद्र सिध्द, २.श्री.राजेश गुलाबचंद व्यास

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८२, भारतनगर,मातोश्रीनगर या परिसरात महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सुरू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री. कोकाटे काशिनाथ :शिक्षण विभागावर प्रश्न पत्रिकेच्या संदर्भात चर्चा झालेली होती प्रशासन माहिती घेवून सभागृहात देणार होते. ती माहिती घेण्यात यावी.

उपआयुक्त (प्रशासन) : या बाबत मी शिक्षक केंद्र प्रमुख तसेच शाळेचे मुख्याध्यापक यांना माझ्या समक्ष दालनात बोलविले असता माहिती घेतली दोन तीन बाबी निदर्शनास आल्या त्या अशा की वर्ग ५ वी ची जी इंग्रजीची प्रश्नपत्रिका होती त्यामध्ये टायपीग मधील दुरूस्ती प्रिटींग प्रेस मधील डिफेक्ट आणि पेपर तपासणी न करणे या बाबी निदर्शनास आलेल्या आहे. प्रश्नपत्रिका तीन शिक्षकाकडून तयार करून घेतलेल्या होत्या त्यामधील एक संच सलेक्ट करून प्रिटींगप्रेसकडे दिला प्रिटींग झाल्यानंतर ती प्रश्नपत्रिका केंद्र प्रमुखाकडे तपासणी करण्यासाठी पाठविण्यात आली.तरी पण दुरूस्ती झालेली नाही. प्रिटींग झाल्यानंतर घाईघाईने प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका तशीच गठ्ठयामधे घेतली आणि आज सकाळी विदयार्थ्यांना वाटप केली. याबाबतीमधे ज्या संस्थैला काम दिले होते. त्यांनी प्रिटींग चुकीची केलेली आहे. ज्या केंद्र प्रमुखाला तपासणीसाठी दिले होते त्यांनी ते केलेच नाही. प्रश्न क्र ५

ठिकाणी ६ व ६ च्या ठिकाणी ५ आला. चूका झालेल्या आहेत. ज्या शिक्षकांनी पेपर काढलेला आहे त्याची चूक नाही. प्रिन्ट केलेला पेपर तपासणी करणे यामधे चूक झालेली आहे. पेपर तपासणी करणे आवशक होते ते झालेले नाही. ज्यांच्या चुकीमूळे हे झालेले आहे. सदर शिक्षकाची एक वेतनवाढ रोखण्याची मी शिफारस करीत आहे. ज्या प्रिटींग प्रेसने काम केलेले आहे ते चूकीचे केले.

श्री. संजय सिरसाट : प्रिटींग करणे हा त्याचा व्यवसाय आहे. जे प्रिन्टींगसाठी लिहून दिले ते त्यांनी केले. तपासणी करण्याचे जबाबदारी प्रशासनाची होती. प्रिन्ट काढण्यास दिल्यानंतर त्याची एक प्रत तपासणी साठी दिल्यानंतर ते तपासणी करण्याचे काम प्रशासनाचे असते. प्रिटींग मालकाचे काम नाही. तपासणी करून दिल्यानंतर तो पुन्हा क्लीअर करून प्रिन्ट काढून देईल.चूक त्यांची नाही.

श्री. देसरडा प्रशांत : चूक झालेली कबूल केलेली आहे. प्रिटींग मालकांचा दोष नाही.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : आताच खूलासा केला. ज्या लहान मोठया चूका होतात याची फार मोठी किमंत विदयार्थ्यांना चुकावी लागते. त्याच बरोबर पालकांना सूध्दा जे केंद्र प्रमुख आहे त्यांचेकडे जबाबदारी दिली होती. तपासणी करून तो पेपर बरोबर आहे की नाही. जो पेपर काढला तो बरोबर आहे की नाही. याची जबाबदारी केंद्र प्रमुखाकडे होती. त्यांची चूक झालेली आहे. ते काम करण्यास सक्षम नसेल तर त्यांना त्या पदावरून काढावे जे सक्षम असतील त्यांचेकडे काम दयावे.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : शाळेचे मुख्याध्यापक यांना बसून पगार दयायचा का. यामूळे महापालिकेची बदनामी होईल. चूकीची पेपर कसे छापले जातात. जे दोषी असतील त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

डॉ. भागवत कराड :विदयार्थ्यांनी वर्षभर अभ्यास करून जर प्रश्न पत्रिका चूकीची काढली जात असेल तर अत्यंत चूकीचे आहे. ज्यांची चूक झाली आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.त्या प्रश्नाचे मार्क त्या विदयार्थ्यांना मिळावे किंवा त्या विषयाची पून्हा परीक्षा घेण्यात यावी.

उपआयुक्त (प्रशासन) : आजचा जो पेपर होता तो २० तारखेला घेण्यात येणार आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : चोकशी नेमू नये. जी चूक झाली ती झालेली आहे. मा.आयुक्तांनीही पाहिलेले आहे. यात दोषी कोण आहे ते बघावे. आणि योग्य ती कार्यवाही करावी. उगीच कुणाचा बळी घेवू नये.

डॉ. भागवत कराड : मा. आयुक्तांनी कार्यवाही करण्याचे आदेश करावे व २० तारखेला त्या विषयाचा पेपर घेण्याचे आदेशीत करावे.

मा. महापौर : या संबधीत २० तारखेला संबधीत विषयाचा पेपर घेण्यात यावा व मा. आयुक्तांची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

## ऐनवेळचे प्रस्ताव

**विषय क्र. २४०/१ :**

दिनांक १८.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत औरंगाबाद महानगरपालिका अधिसूचित सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे दिनांक ०१.०४.२००६ पासून हस्तांतरण होईल, असे गृहित धरून विषय क्रमांक २११/१६ मध्ये विविध संवर्गातील एकूण १६५ पदांना मंजुरी देण्यात आलेली आहे. सिडको हस्तांतरणानंतर अधिसूचित सिडको भागात नागरी मुलभूत सेवा सुविधा द्याव्या लागणार आहेत. जसे मालमत्ता कर आकारणी करून कराची वसूली करणे, अतिक्रमण रोखणे, स्वच्छता विषयक कामे इत्यादी कामांचा व्याप पाहता सिडको विभागाकरीता उपआयुक्त या संवर्गाचे पद नव्याने निर्माण करणे आवश्यक आहे.

तरी सिडको विभागाकरिता उपआयुक्त या संवर्गाचे एक पद वेतनश्रेणी रू.८०००-२७५-१३५०० मध्ये नव्याने महानगरपालिकेच्या अस्थापनेवर निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरीता सादर.

मा. महापौर : १६५ पदांना मान्यता दिलेली आहे. त्यात उपआयुक्त यात पद आलेले नव्हते. सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागाचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्याने प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सिडको विभागाकरीता रूपये ८०००-२७५-१३५०० या वेतनश्रेणीत उपआयुक्त या संवर्गाचे एक पद निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४१/२ :**

दिनांक १९.०५.२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ६/२ नुसार श्री.ए.बी.आनंदकर यांना उपआयुक्त (म.) या पदावर दिनांक ०८.०४.२००५ पासून एक वर्षाच्या प्रतिनियूक्तीच्या कालावधीसाठी ठराव मंजुर झालेला आहे.प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ०७.०४.२००६ रोजी संपलेला आहे. महानगरपालिकेला त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ०८.०४.२००६ पासून एक वर्षासाठी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीस अधीन राहून वाढवून देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

श्री. संजय जगताप : उपआयुक्त यांना परत पाठवावे.

श्री. वसंत नरवडे : एक वर्षासाठी मुदतवाढ द्यावी.

डॉ. भागवत कराड : उपआयुक्त महसूल श्री.आनंदकर यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला आहे त्यांना त्यांचे विभागाकडे परत पाठवावे, मुदतवाढ देवू नये.

मा.आयुक्त : मला मत व्यक्त करू द्यावे.

श्री. संजय जगताप : कशासाठी मुदत वाढवून द्यायची.

मा.महापौर : उपआयुक्त (म.) यांचे प्रतिनियूक्तीचा कालावधी दिनांक ०७.०४.२००६ रोजी संपलेला आहे. त्यांना मुदतवाढ देण्यास मंजुरी नाकारण्यात येते. त्यांना महसूल विभागात त्वरीत परत पाठविण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.ए.बी.आनंदकर, उपआयुक्त (म.) यांचा प्रतिनियूक्तीचा कालावधी दिनांक ०७.०४.२००६ रोजी संपलेला आहे. त्यांना पुढील मुदतवाढ देण्यास मंजुरी नाकारण्यात येत असून त्यांना शासन महसूल विभागात परत पाठविण्या बाबत मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

मा.आयुक्त : मला बोलायचा अधिकार आहे, या प्रस्तावावर प्रशासनास मत मांडू द्यावे.

श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ : चूकीचा पायंडा पडत आहे. मतदान घेण्यात यावे.

मा.महापौर : या संदर्भात विरोधी पक्ष नेता यांनीही पत्र दिलेले होते व सभागृहाचे मत लक्षात घेवून निर्णय घेतलेला आहे.

श्री. कैलास गायकवाड : माझी विनंती आहे, प्रशासनाचे मत पण ऐकण्यात यावे. सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे. या प्रस्तावावर मतदान घेण्यात यावे.

श्री.संजय जगताप : मा.विभागीय आयुक्तांकडिल चौकशी आल्यानंतरही येथे ठेवलेले आहे.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

**नगरसचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.